सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १४ जून २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ७२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com





**छत्रपती संभाजीनगर** – पांडे आयर्न ॲण्ड ट्रेडींग कं., शहा स्टील ट्रेडर्स, रॉयल ट्रेडर्स, वाय.के.ट्रेडर्स, **नारेगाव** – एन.के.ट्रेडर्स, **हर्सुल** – सुरेश ट्रेडर्स अँड हार्डवेअर, **बेरीबाग** – सारा ट्रेडर्स, **सावंगी** – अंजनी ट्रेडर्स, **पिसादेवी** – देवदत्त ट्रेडर्स, **शेंद्रा एमआयडीसी** – निशांत ट्रेडर्स, **करमाड** – साई बिल्डींग मटेरिअल ॲण्ड सप्लायर्स, **आडुळ** – शिवकृपा ट्रेडर्स, **वाळुजगाव** – चंद्रपुष्प इंटरप्राईजेस, **पडेगाव** – कमलेश ट्रेडींग कं, **वैजापूर** – राजाराम स्टील ट्रेडर्स, **लोणी**– बाबा ट्रेडर्स, **देवगाव रंगारी** – मराठवाडा ट्रेडर्स, **खंडाळा** – रविराज ॲग्रो एजन्सीज, **गंगापूर** – हरिओम ट्रेडर्स, **लासूर स्टेशन** – साई ट्रेडिंग कंपनी (मढीकर), **लिंबेजळगाव** – श्री.विठ्ठल कृपा ट्रेडर्स, **महालगाव** – महालक्ष्मी स्टील ट्रेडर्स, **शिऊर बंगला** – जलाल ट्रेडर्स, **पैठण** – संजय ट्रेडर्स, **बिडकीन** – मानधने स्टील ट्रेडर्स, **वासडी** – संतोष ट्रेडर्स, **पिशोर** – रेणुका ट्रेडर्स, **सिल्लोड** – सहारा ट्रेडर्स, **गोळेगाव** – सागर ट्रेडर्स, **उंडणगाव** – श्री.गणेश ट्रेडर्स, **अंधारी** – विशाल ट्रेडर्स, **आळंद** – गजानन ट्रेडर्स, **फुलंब्री** – गजानन ट्रेडर्स, शिव ट्रेडर्स, **पाल फाटा** – योगराज ट्रेडींग कंपनी, श्री.जगदंबा स्टील ट्रेडर्स, **बोरगाव गणपती** – संजय हार्डवेअर, **सुलतानपूर** – लक्की मशिनरी स्टोअर्स, **कन्नड** – मोरया ट्रेडर्स, **विहामांडवा** – वर्धमान हार्डवेअर अँण्ड मशिनरी, **शिऊर** – विठ्ठल ट्रेडर्स, **औराळा** – बालाजी ट्रेडर्स, **पाणपोईफाटा** – भगवती स्टील, **पाचोड** – श्रीनाथ ट्रेडर्स ॲण्ड हार्डवेअर, **चितेगाव** – दुर्गा स्टील ट्रेडर्स.

आयकॉन स्टील

टीएमटी बार


# महायुतीमध्ये राज ठाकरे आल्यास आनंदच होईल : उदय सामंत

नाशिक, १३ जून (हिं.स.) : महायुतीमध्ये नवीन कोणी आलं तर त्याचा आम्ही स्वागतच करू असे स्पष्ट करून राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले की , ज्या पद्धतीप्रमाणे विमान अपघाताचे राजकारण करण्याचा प्रयत्न हा करण्यात आला तो चुकीचा आहे मतदार त्यांना योग्य तो धडा शिकवतील.

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत हे नाशिक दौऱ्यावरती आले होते यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात विविध बैठका संपन्न झाल्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, राज ठाकरे यांच्यासारखा नवीन सदस्य जर महायुतीमध्ये येणार असेल तर त्याचे आम्ही स्वागतच करू त्याच्यापासून महायुतीला चांगलाच फायदा होईल असा विश्वास व्यक्त करत ते पुढे म्हणाले की याचा आम्हाला आनंदच आहे. असे स्पष्ट करत ते म्हणाले की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये शिवसेना शिंदे गट हा गट म्हणून नाहीतर पक्ष



म्हणूनच निवडणूक लढवणार आहे आता गट हा समोरच्या बाजूला उरला आहे असे सांगून आम्हाला महायुती म्हणून निवडणूक लढवायची आहे त्यामुळे आम्ही भाजपा बरोबर महायुती म्हणूनच निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट करत भाजपाने काय नारा दिला आहे याकडे आम्ही लक्ष देणार नाही तर महायुतीचे सदस्य म्हणून एकत्रित निवडणूक लढवू.

नासिक मध्ये राजुर बहुला येथे २५ एकर जागेमध्ये आयटी पार्क होणार आहे त्यासाठीची जागा ही निश्चित करण्यात आली असून लवकरच या ठिकाणी आयटी पार्कच्या कामाला सुरुवात होणार आहे तर महानगरपालिकेने यापूर्वी केलेल्या १५ एकर जागेच्या संदर्भामध्ये देखील आम्ही लवकरच तेथील आयटी पार्कच्या कामाला देखील सुरुवात करणार असल्याचे सांगून ते म्हणाले की नाशिक मध्ये लवकरच एक मोठी कंपनी येणार आहे त्या कंपनीच्या नावासंदर्भात त्यांनी कोणतीही घोषणा करण्यास स्पष्टपणे नकार दिला असून लवकर कंपनीचे बैठक होऊन नाशिकच्या योजनेची घोषणा केली जाईल असेही स्पष्ट करत

सामंत म्हणाले की, उद्योग विभाग हा कदापि दर्या खोऱ्यातील जागा घेणार नाही कारण त्या जागेचा आम्हाला काही उपयोग होणार नाही आमची ही स्पष्ट भूमिका असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

## मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पुन्हा 'ॲक्टीव्ह मोडवर' मुंबईत उपोषणाला सुरुवात

मागील दोन वर्षांपासून मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे मराठा आरक्षणच्या मुद्द्यावरुन सातत्याने आंदोलन उपोषण करीत आहेत. काही दिवसांपूर्वीच स्थगित केलेलं उपोषण आता पुन्हा एकदा जरांगेंनी मनावर घेत सरकारविरोधात आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा रस्त्यावर उतरणार असल्याची माहिती समोर येत आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे आता थेट मुंबई गाठून मुंबईत उपोषण सुरु करणार असल्याची घोषणा खुद्द जरांगे यांनी केली आहे. येत्या २९ ऑगस्ट रोजी मनोज जरांगे उपोषणाला बसणार आहेत. ते अंतरवली सराटीतून पत्रकार परिषदेत बोलत होते.

मनोज जरांगे यांचं ठरलं

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, आमच्या लेकराबाळांचं जर वाटोळ होत असेल आता आम्ही शांत बसणार नाहीत. मराठा आणि कुणबी हे एकच आहेत. त्यांचे पुरावे पोलिस पाटील, ग्रामपंचायत देवस्थानाकडे यासंदर्भातील पुरावे आढळून आलेले आहेत. त्यामुळे आता मराठा आणि कुणबी हे एकच असल्याचा कायदा सरकारने पारित करावा, आणि गोरगरीब मराठ्यांच्या आरक्षणाच्या मागणीसाठी येत्या २९ ऑगस्टला मुंबईत उपोषण करणार असल्याची घोषणा मनोज जरांगे यांनी केलीयं. दरम्यान, आता कुठल्याही प्रकारे माघार घेणार नाही. सरकारकडे आता कारणच नाही मराठा समाजाने काय करायचं आता हे एक ऑगस्टला आपण सांगणार आहे.

२९ ऑगस्टला मुंबईमध्ये उपोषण करणार असून मराठा कुणबी एकच हा अध्यादेश अद्याप काढलेला नाही मागणीवर आम्ही ठाम आहोत. कायदा पारित करायचा असेल तर आम्हाला वेळ देण्याची मागणी गिरीश महाजनांनी केली होती, त्यानंतर आम्ही वेळ दिला. कायद्याला आधार लागतो असं महाजन म्हणत होते, ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत हे पुरावे खूप झाले आहेत आधारासाठी, असं मनोज जरांगे यांनी पुढे म्हंटले आहे.

## हरित ऊर्जा विकासाचे प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करा : मुख्यमंत्री

मुंबई, १३ जून : जनतेला स्वस्त दरात व जास्तीत जास्त वीज उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण आहे. ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी ऊर्जा विभागाने कालबध्द नियोजन करावे. आगामी काळात हरित ऊर्जा विकासावर भर देण्याची गरज असून वीज वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे ऊर्जा विभागाच्या योजनांचा आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे (दूरदृश्यप्रणालीद्वारे), राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर, उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, अपर मुख्य सचिव वित्त ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव नियोजन राजगोपाल देवरा, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक डॉ संजीव कुमार, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राधाकृष्णन बी. महाऊर्जा विकास संस्थेच्या महासंचालक डॉ.कादंबरी बलकवडे यांच्यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, ऊर्जा क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची आणि गेम चेंजर असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करा. पीएम सुर्यघर: मोफत वीज योजनेमध्ये राज्यातील सर्व शासकीय इमारतींचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यासाठी महाऊर्जा ने सर्वेक्षण पूर्ण करून या कामाला गती द्यावी. मॉडेल सोलर व्हिलेजसाठी महाऊर्जा व महावितरण कंपनीने संयुक्तपणे काम करावे. महाऊर्जा, निर्मिती व पारेषण विभागातील प्रत्येक प्रकल्पाची कामे गती शक्ती योजनेच्या धर्तीवर विहित वेळेत पूर्ण करावीत गळती कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या योजनांची प्रभावी अमंलबजावणी करून वीज वापरासाठी जनजागृती करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

## शनि शिंगणापूर देवस्थानमधून १६७ कर्मचाऱ्यांची कामावरुन हकालपट्टी; ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांचा समावेश

### सकल हिंदू समाजाच्या आंदोलनानंतर घेतला निर्णय

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर देवस्थानने आपल्या १६७ कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकले आहे. यामध्ये ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांचा समावेश होता. अनियमितता आणि शिस्त पालन न केल्याच्या कारणावरुन या कर्मचाऱ्यांची गच्छंती केल्याचे शनि देवस्थानकडून स्पष्ट करण्यात आले. देवस्थानातील ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांना हटवण्याबाबत सकल हिंदू समाज आंदोलनाच्या पवित्र्यात होता.

श्री क्षेत्र शनि शिंगणापूर मंदिरात मुस्लिम कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवरुन वाद वाढला होता. शनि शिंगणापूर मंदिर ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या ११४ मुस्लिम




कर्मचाऱ्यांविरुद्ध हिंदू संघटना आक्रमक झाल्या होत्या. ट्रस्टने सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना तात्काळ कामावरुन काढून टाकावे अशी संघटनेची मागणी होती. अन्यथा १४ जून रोजी मंदिराबाहेर संपूर्ण हिंदू समाजाकडून मोठा मोर्चा काढला जाईल, असा इशारा देखील दिला होता.

गेल्या २१ मे २०२५ रोजी मुस्लिम कारागिरांनी मंदिराच्या पवित्र व्यासपीठावर ग्रिल बसवले आणि भगवान शनिदेवाच्या व्यासपीठाची स्वच्छता आणि रंगरंगोटी केली होती. तेव्हा हे प्रकरण अधिकच तापले होते. या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि हिंदू संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला होता. त्यानंतर आता मंदिराच्या विश्वस्त मंडळाने सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत मंदिर ट्रस्टने स्पष्टीकरण दिले होते, त्यानुसार ट्रस्टमध्ये ११४ मुस्लिम कर्मचारी काम करतात हे मान्य केले आहे. मात्र ट्रस्टच्या म्हणण्यानुसार, या कर्मचाऱ्यांपैकी एकाही मुस्लिम कर्मचाऱ्याची ड्युटी मंदिराच्या मुख्य गर्भगृहात किंवा चबुतऱ्यावर नाही. हे कर्मचारी मुख्यतः शेती विभाग, कचरा व्यवस्थापन विभाग आणि शिक्षणाशी संबंधित कामांमध्ये कार्यरत आहेत. यापैकी ९९ कर्मचारी मागील ५ महिन्यांपासून कामावर अनुपस्थित असून त्यांच्या पगारावरही आळा घालण्यात आला आहे.

## राज्य सरकारने शालेय बस वाहतुकीसंदर्भात लागू केले नवीन नियम

पुणे : विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य सरकारने शालेय बस वाहतुकीसंदर्भात नवीन कडक नियम लागू केले आहेत. मागील शैक्षणिक वर्षात घडलेल्या काही दुर्दैवी घटनांच्या पार्श्वभूमीवर यंदा शाळा सुरू होण्यापूर्वीच हे खबरदारीचे उपाय योजण्यात आले आहेत. याअंतर्गत शालेय बसचालकांची पार्श्वभूमी कसून तपासली जाणार असून त्यांची




नियमित मद्यपान आणि औषध चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी कडक पावले उचलली आहेत. यानुसार बसचालक, सफाई कामगार आणि महिला सेविकांची सकाळी व सायंकाळी अशा दोनवेळा मद्यपान व औषध चाचणी करणे अनिवार्य असणार आहे.

या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना राज्यातील सर्व शाळांना देण्यात आल्या आहेत. या नवीन नियमांमुळे शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित होईल आणि अनुचित प्रकारांना आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केली पाणीपुरवठा योजनेची पाहणी

### पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करा - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

छत्रपती संभाजीनगर, दि.१३, (विमाका) :- विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज जायकवाडी धरणातील उद्धव विहीर (जॅकवेल) पासून ते नक्षत्रवाडी येथील जलशुदधीकरण केंद्र येथे सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यामुळे पाणीपुरवठा योजनेतील जॅकवेल, प्रोच ब्रिज, फिल्टर प्लँट आदीसह सुरू असलेल्या कामाची पाहणी करून प्रत्येक कामाला काम पूर्ण करण्याबाबत विहित कालावधी निश्चित करण्यात आला आहे. विहित कालावधीत कामे पूर्ण करा,असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी आज संबंधित यंत्रणेला दिले.



पाहणी दौऱ्यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता श्रीमती मनीषा पलांडे, नगरपालिका प्रशासन सह आयुक्त देविदास टेकाळे, मजीप्रचे कार्यकारी अभियंता किरण पाटील, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री.देशमुख यांच्यासह सबंधित यंत्रणेचे प्रमुख उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री पापळकर म्हणाले, छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करण्यात येणार आहे. पाणीपुरवठ्यासाठी जॅकवेलचे काम वेळेत संपवून पाणी उपसा सुरू करणे, २६ एमएलडीचा टप्पा जूनअखेर पूर्ण करणे, यासह कंत्राटदारांनीही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाचे नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कंत्राटदार कंपनी आणि महापालिकेच्या सबंधित यंत्रणेने आपसात समन्वय ठेवत विहित कालमर्यादेत काम पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. महापालिका व कंपनीतर्फे करण्यात येणारी उपाययोजना याबाबत त्यांनी माहिती घेतली.

विहित कालमर्यादेत काम पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ वाढविणे, २४ ठिकाणच्या जोडण्या पूर्ण करणे, ३० टाक्याचे बांधकाम आणि वितरण व्यवस्था जोडणीचे काम मागे पडले आहे ते काम कंत्राटदाराने पूर्ण करण्याबाबत विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी सूचना दिल्या.

जायकवाडी धरणक्षेत्रातील जॅकवेल, चितेगाव येथे सुरू असलेले मुख्य जलवाहिनीचे काम, फारोळा येथील २६ दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, नक्षत्रवाडी येथील ३९२ दशलक्ष प्रतिदिन क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, नक्षत्रवाडी येथील मुख्य संतुलन जलकुंभ या सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी पाहणी करून अडचणीही जाणून घेतल्या. मा.उच्च न्यायालयात पाणी पुरवठा योजनेबाबत जनहित याचिका सुरू असून प्रशासनाकडून मा.उच्च न्यायालयाला वेळेवेळी पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा दिला जातो. ११ जून रोजी याबाबतचा आढावा देण्यात आला. मुख्यमंत्री महोदय यांनीही मुंबई येथे नुकतीच पाणीपुरवठा योजनेबाबत आढावा बैठक घेतली असून या बैठकीत छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजनेची सर्व तांत्रिक पूर्तता करून ती ऑक्टोबर अखेरीस कार्यान्वित करा असे निर्देश देण्यात आले आहेत. यावेळी संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## सोयगाव – फर्दापूर रोड झाडे आडवी, काही भागात पत्रे उडाली, ग्रामस्थांची धावपळ, पेरणी केलेल्या कपाशी,मका पिकांना दिलासा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ जून

सोयगाव सह परिसरात बुधवारी रात्री आठ ते साडे आठ वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्या सह विजांच्या कडकडाटात पावसाने आगमन झाले आहे दरम्यान सोयगाव,आमखेडा भागाला वादळी वाऱ्याने जोरदार तडाखा दिल्यामुळे शहरासह आमखेडा गावांत घरांवरील पत्रे उडाली त्यामुळे रात्रीच्या अंधारात ग्रामस्थांची तारांबळ उडाली होती सोयगाव व आमखेडा भागात वादळी वाऱ्याने जोरदार तडाखा दिला दरम्यान यामुळे शहरात झाडे उन्मळून पडली होती झालेल्या पावसाने लागवड केलेल्या कपाशी व धुळपेरण्या केलेल्या मका



पिकांना दिलासा मिळाला आहे. सोयगाव तालुक्यात मंगळवार पासून मक्याच्या धुळपेरण्या हाती घेण्यात आल्या होत्या त्यावर बुधवारी रात्री अर्ध्या तासाच्या पावसाचे आगमन झाले. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.दरम्यान सोयगाव परिसराला पावसाने हुलकावणी दिल्याचे चित्र होते परंतु बुधवारी रात्री वीस मिनिटे सोयगाव सह आमखेडा,कंकराळा, गलवाडा,रावेरी,माळेगाव,पिंपरी, जरंडी,निंबायती,रामपुरातांडा,निंबा यती गाव,बहुलखेडा, कवली,उमर विहिरे,निमखेडी,घोसला या गावांमध्ये रात्री वीस मिनिटे ते अर्ध्या तास पावसाने हजेरी लावली होती. जरंडी,धिंगापूर परिसरात पहिल्याच पावसाने तीस मिनिटे हजेरी लावली आहे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आता गुरुवार (दि.१२) पासून खरिपाच्या पेरण्याची कामे हाती घेण्यात येवून खरीप पेरण्याच्या कामांना वेग मिळणार आहे.

## भिंत कोसळून एक ठार; कन्नड तालुक्यातील कोळवाडी येथील घटना



तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१३ जून – तालुक्यातील कोळवाडी येथे मासेमारी विक्री करण्यासाठी गेल्या व्यक्तीचा अंगावर भिंत कोसळून जागीच मृत्यू झाला. समाधान बंडू गवळी (वय ४९ रा . कन्नड) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.समाधान हे कन्नड पासून जवळच असलेल्या कोळवाडी येथे मासे विक्री करण्यासाठी गेले असता गुरुवार संध्याकाळच्या सुमारास घराकडे परतत असताना वादळ वाऱ्यास जोरदार पाऊस सुरू झाल्याने आसरा घेण्यासाठी ते रस्त्यालगत असलेल्या जुन्या शेड जवळ आसरा घेतला असता जोरदार वाऱ्याच्या प्रवाहाने आडोशाला असलेली भिंत कोसळली त्यात समाधान गवळी यांना डोक्याला गंभीर इजा झाली

घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी त्यांना कन्नड ग्रामीण रुग्णालय येथे आणले असता डॉ. सोहेल शेख यांनी तपासून मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार मंडळ अधिकारी आर.आर.चव्हाण, तलाठी ज्ञानेश्वर शिंदे ग्रामविस्तार अधिकारी व्ही.सी.सोनवणे ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले त्यांच्या पश्चात पत्नी,आई, दोन मुले,बहीण,भाऊ असा परिवार आहे, दि.१३ रोजी दुपारी देवलोक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले

## एमजीएम आणि आयबीएममध्ये सामंजस्य करार संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ : माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असलेली आयबीएम कंपनी आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्यात तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक दर्जाचे शिक्षण, कौशल्यं व आंतरवासिता देण्याबाबत सामंजस्य करार झाला असून शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून हा प्रगत अभ्यासक्रम संयुक्त विद्यमाने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आयबीएम या विश्वविख्यात कंपनीशी करार करणारी एमजीएम ही मराठवाड्यातील पहिली संस्था आहे व त्यामुळे मराठवाडा–विदर्भातील विद्यार्थी वर्गास जागतिक दर्जाचे अत्याधुनिक तंत्रज्ञान शिक्षण मिळणार आहे. एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या पुढाकाराने



व आयबीएम – शिक्षण विभागाचे एशिया – पॅसेफिक प्रमुख हरी रामा सुब्रम्हणीयन यांच्या सक्रिय सहयोगाने हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील गतिमान बदलांना सामोरे जाऊ शकतील असे युवक घडविण्यासाठी तसेच आर्टिफिशियल इंटेलिजिअन्स, मशीन लर्निंग, ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी, आयओटी, क्वान्टम टेक्नॉलॉजी, क्वान्टम कॉम्प्युटिंग, सायबर सिक्युरिटी, बिग डेटा एनालिटिक्स, ऑग्मेन्टेड रियॅलिटी, व्हर्च्युअल रियॅलिटी या भविष्यदर्शी क्षेत्रात प्रवेश करण्यास पात्र युवक तयार करणे यामुळे शक्य होणार आहे.

यावेळी कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.हरिरंग शिंदे अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख,प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, डॉ.परमिंदर कौर,राशी जैन, डॉ.शर्वरी तामणे, डॉ.संजय हरके, आयबीएमकडून आयबीएमचे सल्लागार संजीव मेहता, डेटागामीचे कार्यकारी संचालक धवल शहा, वरिष्ठ व्यवस्थापक श्वेता शहा व सर्व संबंधित उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बालमृत्यूचे प्रमाण शुन्यावर आणण्यासाठी स्टॉप डायरिया अभियान राबवा- गुप्ता

## जिल्ह्यात १६ जून ते ३१ जून या कालावधीत राबविणार अभियान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जून**

अतिसारामुळे होणारे बालमृत्यूचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी जिल्ह्यात दि. १६ जून ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीत विविध उपक्रम राबवून 'स्टॉप डायरिया अभियान' यशस्वीरित्या राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात दि. १० जून रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली स्टॉप डायरियाबाबत जिल्हा सुकाणू समितीची बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, शासकीय म हाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नामदेव पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दीपक मोरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.शैलेजा स्वामी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन राठोड, बाल विकास प्रकल्प अधिकारी व्ही. आर. वाकडे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

स्टॉप डायरियाचे उद्दिष्ट राज्यातील अर्भक मृत्यूदर, बालमृत्यू दर कमी करणे हे राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. देशामध्ये ५ वर्षापर्यंतच्या बालकांच्या मृत्युमागे अतिसार हे प्रमुख कारण असून सुमारे १ ते ७ टक्के बालके अतिसारामुळे दगावतात आणि त्या बालमृत्युचे प्रमाण उन्हाळा व पावसाळ्यात जास्त असते. 'अतिसारावर करा मात, स्वच्छता व ओआरएसची घेऊनी साथ' या घोषवाक्याचा अवलंब करुन 'स्टॉप डायरिया' अभियान यशस्वीपणे राबवावे. अतिसार झालेल्या सर्व मुलांकरिता ओआरएस आणि झिंकचे वाटप होईल व त्यांच्यामार्फत ते पोहचेल हे सुनिश्चित होईल. पाच वर्षाखालील मुलांच्या अतिसार प्रतिबंधक आणि व्यवस्थापनासाठी पालकांचे काळजी घेणाऱ्यांचे योग्य समुपदेश करावे. स्टॉप डायरियाचे ध्येय अतिसारामुळे होणारे बालमृत्यू शून्यावर पोहचविणे हे अंतिम ध्येय आहे.

पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे आजार होतात. सर्व ग्राम पंचायतीमध्ये जलजन्य आजार रोखण्याबाबत लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी जिल्ह्यात १६ जून ते ३१ जुलै दरम्यान अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महिला व बालकल्याण विभाग, शिक्षण विभाग व ग्रामपंचायत विभाग आदीच्या संयुक्त विद्याम ाने राबविण्यात येत आहे. या अभियानामध्ये गावातील अंगणवाड्या प्राथमिक आरोग्य केंद्र, सरकारी कार्यालय व प्राथमिक शाळा या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता असणे आवश्यक आहे.

पावसाळ्यामध्ये दूषित पाणी पिऊन डायरिया, गॅस्ट्रो व कावीळ यासारखे अनेक आजार होत असतात. त्यामुळे पिण्याचे पाणी निर्जंतुक करुन पिण्यासाठी वापरल्यास या आजारांना दूर ठेवता येते. यासाठी गावस्तरावर विविध उपक्रम घेऊन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा व तालुका पा-तळीवर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग राहणार आहे. या बैठकीला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, डॉ. संदीप काळे, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. डी. व्ही सावंत, बालरोग तज्ञ डॉ. गोपाल कदम, डॉ. स्नेहल नगरे, जिल्हा साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश जाधव, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक शंकर तावडे, जिल्हा लेखापाल व्यवस्थापक श्रीपाद गारुडी, सांख्यिकी अधिकारी अजय कदम, डॉ निशांत थोरात, डॉ. प्रशांत पुठावार, डीपीएचएन मनीषा वडकुते, अमोल कुलकर्णी, अझर अली, लक्ष्मण गाभने, सुरभी शाहू आदी सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# विविध मागण्यांसाठी ठाकरे गटाचा रास्तारोको आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जून**

विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीवेळी महायुतीने शेतकऱ्यांची कर्ज माफी करण्यासह इतर आश्वासने दिली परंतु अद्याप ही आश्वासने पूर्ण न केल्याने ठाकरे गट शिवसेनेच्यावतीने येथील हिंगोली ते कनेरगाव महामार्गावर बासंबा फाटा येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतुक दोन तास ठप्प पडली होती. वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या.

विधानसभा निवडणुकीत महायुतीने दिलेल्या आश्वास-नाची आठवण करून देण्यासाठी ठाकरे गटाच्यावतीने आंदोलने करण्यात येत आहेत. क्या हुआ तेरा वादा अशा घोषणा देत येथील हिंगोली ते कनेरगाव नाका महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी संपर्कप्रमुख बबनराव थोरात, माजी खा शिव-ाजीराव माने, सह संपर्क प्रमुख विनायकराव भिसे, जिल्हा प्रमुख गोपू पाटील, उपजिल्हाप्रमुख गणेश शिंदे, संतोष देवकर, विठ्ठल चौतमल, उपजिल्हाप्रमुख परमेश्वर मांडगे, सोपान पाटील, भानुदासराव जाधव, अमोल काळे, आनंदराव जगताप, शंकर घुगे, गणेश मानदार आदीसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दि १२ जून रास्तारोको आंदोलन केले.

यावेळी हिंगोली ते कनेरगाव महामार्गावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी क्या हुता तेरा वादा अशा घोषणा देत महायुती सरकारला आश्वासनांची आठवण करून दिली. यावेळी शासनाला सादर करण्यात आलेल्या निवेदनात शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे, शेतकऱ्यांना २४ तास विज उपलब्ध करून द्यावी, शेतकऱ्यांच्या पिकांना हमीभाव द्यावा, शेतकऱ्यांना १ रूपयांत पीक विमा उपलब्ध करून द्यावा, पांदन रस्ते तयार करावेत, शेतकऱ्यांना डीएपी खत उपलब्ध करून द्यावे, हर घर जल व हर घत छत द्यावे, लाडक्या बहिणींना २१ रूपये प्रमिमाह मानधन द्यावे, वृध्द पेन्शन धारकांना २१ रूपये महिना द्यावा, बासंबा येथील मंजूर उड्डाणपूलाचे काम करावे आदी मागण्यांचा समावेश आहे. या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतुक बराच काळ विस्कळीत झाली होती.

# अवैध दारू विक्रेत्यांची पोलिस ठाण्यात हजेरी घेतली जाणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जून**

अवैध दारू विक्रेत्यांना आता आठवड्यातून दोन दिवस पोलिस ठाण्यात हजेरी लावावी लागण-ार असून त्यांच्यावर ठाणे प्रभारी यांनी विशेष लक्ष द्यावे असे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सर्व पोलिस ठाण्यांना दिले आहेत.

जिल्ह्यात ग्रामीण भागात तसेच अनेक ठिकाणी अवैध दारू विक्री होत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अवैध दारू विक्रेत्यांविरोधात जिल्ह्यात जोरदार मोहीम उघडली असून दोन दिवसांपूर्वी पोलिस अधीक्षक कोकाटे यांनी अवैध दारू विक्रेत्यांना बोलावून तंबी दिली होती. त्यानंतर आता अधिक कठोर कारवाई करण्यासाठी अवैधदारू विक्रेत्यांना आज पुन्हा पोलिस मुख्यालयात बोलावून अवैध दारू विक्री करणाऱ्याविरोधात हद्दपार, एमपीडीए तसेच संघटीत गुन्हेगारी सारखे कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच पोलिस ठाणे स्तरावर विशेष पथकाची स्थापना करून अवैध दारूविक्री तसेच हातभट्टी विकणाऱ्यांवर कार्यवाही करून अटक करण्यात येणार आहे. तसेच परवानाधारक देशी व विदेशी दारू विक्रेत्यांनी परवान्याच्या अटी व शर्तीचे उल्लंघन करू नये असे केल्यास त्यांच्यावरही कठोर कार्यवाही करण्याचे आदेश पोलिस ठाण्यांना दिले आहेत.



**हिंगोली- जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली असून पेरणीयोग्य पाऊस झालेल्या ठिकाणी शेतकऱ्यांकडून पेरणीची कामांची लगबग सुरू झाली आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील एका शिवारात शेतकरी कुटुंब हळदीची लागवड करतांना दिसत आहे. छाया- दत्तात्रय शेगुकर**


## संक्षिप्त वृत्त

### अग्रवाल महिला मंडळाची कार्यकारणी जाहीर



हिंगोली- येथील अग्रवाल महिला मंडळाची सन २०२५-२६ ची नवीन कार्यकारणी नूतन अध्यक्षा पूजा संजय बगडीया यांनी जाहीर केली असून यावेळी पूर्व अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. नवीन कार्यकारणीमध्ये सचिव वर्षा कयाल, सहसचिव श्रेया चौधरी, मंजू बगडीया, उपाध्यक्षा संगीता चौधरी, कोषाध्यक्षा समीक्षा बगडीया, सह कोषाध्यक्षा नीतू देवडा, अनिता बगडीया, जनसंपर्क अधिकारी नीता कयाल, रश्मी बगडीया यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा कार्यकारणी सदस्य म्हणून कविता अग्रवाल, अर्चना गांजापूरवाले, सीमा अग्रवाल, संगीता कयाल, रेखा अग्रवाल, सविता अग्रवाल, चित्रा भारूका, मिनाक्षी बगडीया, ज्योति अग्रवाल, अंजू देवडा, संगीता भारूका यांचा समावेश आहे. यावेळी माजी अध्यक्षा पूजा बगडीया, वर्षा कयाला यांचा सत्कार करण्यात आला.

### संत गुलाबराव महाराज दिंडीचे स्वागत



हिंगोली- अमरावती जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चांदूरबाजार येथील संत श्री गुलाबराव महाराज यांच्या पायदळ दिंडी व पालखीचे हिंग-ोलीत शहरात स्वागत करण्यात आले. पालखीत २०० वारकरी असून ३२ वर्षापासून यजमान आर एम अग्रवाल यांच्या निव-ासस्थानी पालखीचे विधीवत स्वागत करण्यात आले. बालाजी मंदिरात वारकऱ्यांची भोजनाची व निवासाची व्यवस्था करण्यात आली. सद्गुरू सेवा प्रतिष्ठानच्यावतीने आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी अग्रवाल परिवारासह आदींनी पालखीचे दर्शन घेत परिश्रम घेतले. शुक्रवारी ही पालखी दिग्रस कऱ्हाळे मार्ग पंढरपूरकडे निघाली.

### १७८ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- जिल्ह्यात अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७८ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाच्यावतीने कार्यवाही करण्यात आली असून त्यांच्याकडून १ लाख ५० हजारांचा दंड वसूल करण्यात आला.

# नगर परिषद, पोलिस प्रशासनाची अतिक्रमणावर कार्यवाही



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जून**

शहरातील अग्रसेन चौक, देवडा नगर तसेच कळमनुरी रस्त्यावरील अतिक्रमणावर नगर परिषद आणि पोलिस प्रशासनाने संयुक्त कार्यवाही करीत अतिक्रमणे हटवली आहेत.

अग्रसेन चौक ते कृषी विभाग कार्यालयापर्यंत असणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर मागील काही दिवसांपासून पान टपऱ्या तसेच कोल्ड्रींक्स दुकाने आणि इतर दुकाने थाटण्यात आली. त्यामुळे रस्ता अरूंद होत चालला होता. या भागात सतत वाहतुकीच वर्दळ असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, पोलिस निरीक्षक एस मोदे यांच्यासह पोलिस पथकाने जेसीबीच्या माध्यमाने या रस्त्यावरील अतिक्रमणे काढली.

# सेनगाव तहसीलदारांच्या पथकाने २५ ब्रास वाळू साठा केला जप्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जून**

सेनगाव तहसीलदार सखाराम मांडवगडे यांच्या पथकाने तालुक्यातील वाढोणा पाटीजवळ २५ ब्रास अवैध वाळूसाठा जप्त करून ट्रॅक्टर इतर म ुद्देमाल जप्त करून कारवाई करण्यात आल्याने तालुक्यातील अवैध वाळू माफीयांचे धाबे दणाणले आहेत.

हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यात होत असलेली अवैध व बेसुम ार रेती उपसा करणाऱ्या वाळूमाफिया कठोर कारवाईची सूचना तालुका प्रशासनाला देण्यात आल्या असून त्या अनुषंगाने दिनांक १० जून रोजी दुप-ारी दोन वाजण्याच्या सुमारास तहसी-लदार सखाराम मांडवगडे यांनी वाढोणा शिवारात वाळू २५ ब्रास अवैध रेतीसाठा केला असल्याची गुप्त माहिती तह-सीलदार मांडवगडे यांना प्राप्त होताच त्यांनी लगेच आपले कार्यालय कर्मचारी घटनास्थळी जाऊन अवैधरित्या पंचवीस ब्रास वाळू साठा व एक ट्रॅक्टर यासह इतर मुद्देमाल जप्त करून तो संबंधित गावचे सरपंच यांच्या स्वाधीन केला. ट्रॅक्टर व त्यामध्ये एक ब्रास रेती साठा हे तहसील परिसरात आणून लावण्यात आले. तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी केलेल्या कारवाईमुळे तालुक्यातील वाळूमाफियामध्ये खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार सखाराम म ांडवगडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून या पथकाम ध्ये तहसीलदार सखाराम मांडवगडे, नायब तहसीलदार देवराव कारगुडे, मंडळ अधिकारी घुगे, तलाठी बाळू खेलवाडे, तलाठी हेंबाडे, कोतवाल घुगे, शुभम मुळे आदींचा पथकामध्ये समावेश होता. तालुक्यात अवैध वाळू उपसा करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्याची मालिका सतत चालू राहणार असल्याचा इशारा तहसीलदार सखाराम मांडवगडे यांनी दिला आहे. तालुक्यात होत असलेली अवैध वाळू उपशाबाबत नागरिकांनी निसंकोचपणे तहसील प्रशासनाला किंवा मोबाईलद्वारे माहिती द्यावी, असे आवाहनही तहसीलदार म ांडवगडे यांनी केले आहे.

# गण गण गणात बोते च्या गजराने सेनगाव नगरी दुमदुमली



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, १३ जून**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी यांच्या आषाढी एकादशी निमित्त दर्शनासाठी निघालेली शेगाव येथील श्री गजानन महाराज यांची पालखी सोहळा दि १२ जून रोजी सेनगाव नगरीत दाखल झाली.गण गण गणात बोते च्या जयघोषाने संपूर्ण सेनगाव नगरी दुमदुमली शहर वासियांकडून श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे जंगी स्वागत करण्यात आले.

आषाढी एकादशी निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी यांच्या दर्शनासाठी निघालेल्या श्री गजानन महाराज यांचा पालखी पायवारी दिंडी सो-हळा गुरूवारी सेनगाव येथे दुपारी चार वाजण्याच्या सुमारास आगमन होताच ढोल ताशाच्या गजरात श्रीच्या पालखीचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी शहरातील पालखी मार्गावरून स्व-ागत कमानी व डिजिटल बॅनर मोठ्या प्रमाणात उभारण्यात आले होते. तसेच शहरातील प्रतिष्ठाने व घरासमोरील अंगणामध्ये स्वागता साठी रांगोळी आखण्यात आल्या होत्या. अनेक ठिकाणी पा-लखी सोहळ्यातील वारकरी यांना पाणी, बिस्कीट, फळ इत्यादी नाश्त्याची सोय करण्यात आली होती. या दिंडीचे मराठवाड्यात पानकनेरगाव मार्गे सेनगाव मुक्कामी आगमन करण्यात आले होते. या श्री च्या पालखी सोहळ्यात एकूण सातशे वारकऱ्यांचा समावेश असून सर्व वारकऱ्यांमध्ये भगव्या पताका घेऊन अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने ते आपला मार्गस्थ पार करत होते. पालखीसोबत चार रुग्णवाहिका व एक मोठी बस, सुरक्षा गार्ड वाहन, आरोग्य पथक याचा पोलीस प्रशासन वाहतूक शाखेचे वाहन दंगा नियंत्रण पथक यांचा समावेश होता. शहरात श्रीची पालखी दाखल झाल्यानंतर पंचक्रोशीतील भाविकांसाठी श्री गजानन महाराज यांचे सुलभ दर्शन व्हावे यासाठी अतिशय सुरेख असे नियोजन सेनगाव नगरपंचायत कडून करण्यात आले होते तसेच रात्री मुक्कामी राहणाऱ्या श्री च्या पालखीतील वारकरी व भाविक भक्तांसाठी शहर वासियांकडून म हाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ पंचकोशीतील हजारो लोकांनी मोठ्या आनंदात घेतला. श्री च्या पालखी सोहळ्या दरम्यान सेनगाव शहर अतिशय भक्तिमय व गण गण गणात बोतेच्या जयघोषाने दुमदुमून गेले असल्याचे पहावयास मिळाले अतिशय शिस्त व स्वच्छता व नियोजनाचे सुरेख असे नियोजनबद्ध कार्यक्रम पाहावयास मिळाला यावेळी पालखीचे मराठवाडा हद्दीवर भाजपचे युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी स्वागत केले तसेच शहरातील ज्येष्ठ भाविक अंबादासराव देशमुख, शिवसेना जिल्ह-ाप्रमुख संदेश देशमुख, शिवसेना जिल्हा समन्वयक दिनकरराव देशमुख, राष्ट्रवादीचे युवा नेते संदीप देशमुख व्यापारी असोसिएशन तालुकाध्यक्ष राजकुमार देशमुख यासह पंचकोशीतील भाविक व महिला यांनी श्रीच्या पालखीचे दर्शन घेऊन स्वागत केले शहर नगराध्यक्ष मनीषाताई कैलास देशमुख उपनगराध्यक्ष शालिनीताई देविदासराव देशमुख, नगरसेविका राधाताई देशमुख, नगरस-ेवक शिलानंद वाकळे, नगरसेविका ज्योतीताई देशमुख, विमलताई गाढवे, शीलाताई कोकाटे, मीराताई खाडे, उषाताई मानकर, नगरसेवक ओम प्रकाश देशमुख, नगरसेविका पर्यागताई फटांगळे, स्वातीताई बहिरे, नगरसेवक निखिल देशमुख, जगन्नाथ देशमुख, सतीश देशमुख यासह गावा-तील प्रतिष्ठित नागरिकांनी पुढाकार घेऊन श्रीच्या पालखीच्या मुक्कामाची योग्य सोय करण्यात आली होती. यावेळी तहसीलदार सखाराम मांडवगडे, गटविकास अधिकारी सुरेश कांबळे, मुख्याधिकारी गणेश गाजरे, पोलीस निरीक्षक दिपक मस्के यांनी पालखी सोहळ्याचे विशेष असे स्वागत केले.

# बिझनेस सायकल फंड : आर्थिक चढ-उतारासोबत गुंतवणुकीसाठी उत्तम पर्याय



नागपूर : सतत बदलणाऱ्या आणि प्रभावी ठरणाऱ्या आर्थिक परिस्थितीत गुंतवणूकदार असे पर्याय शोधत आहेत, जे स्थिर एलोकेशनपलीकडे जाऊन बदलत्या परिस्थितींशी जुळवून घेणारी लवचिकता प्रदान करतील. अशाच एका दृष्टीकोनाला सध्या वेगाने लोकप्रियता मिळत आहे. तो म्हणजे बिझनेस सायकल फंड. हा इक्विटी म्युच्युअल फंड्सचा एक प्रकार आहे, जो आर्थिक सायकलमधील वेगवेगळ्या टप्प्यांशी सुसंगतपणे पोर्टफोलिओ एलोकेशन ठरवण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

बंधन एएमसी (इक्विटी) चे उपाध्यक्ष विशाल बिरैया यांच्या मते, पारंपरिक इक्विटी फंडांप्रमाणेच निश्चित क्षेत्रीय वाटप न ठेवता, हा फंड अधिक सक्रिय आणि टॉप-डाउन गुंतवणूक धोरण स्वीकारतात. यामध्ये फंड मॅनेजर जीडीपी वाढीचे कल, व्याजदर, महागाई, वित्तीय धोरण, जागतिक संकेत व चलन हालचाली यासारख्या घटकांचे विश्लेषण करून व्यापक आर्थिक मूल्यांकन करतात. या विश्लेषणाच्या आधारावर ते अशा क्षेत्रांची निवड करतात, जे सध्याच्या किंवा येणाऱ्या सायकल फेजमध्ये चांगली कामगिरी करू शकतात.

बिझनेस सायकल गुंतवणुकीचा मूळ गाभा 'सेक्टर रोटेशन'मध्ये आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांची कामगिरी आर्थिक सायकलच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये बदलत असते. उदाहरणार्थ, जेव्हा अर्थव्यवस्था सुधारते, तेव्हा औद्योगिक, पायाभूत सुविधा आणि ग्राहक टिकाऊ वस्तू क्षेत्र चांगली कामगिरी करतात. पण जेव्हा ही सायकल परिपक्वतेकडे जाते किंवा अनिश्चिततेचे वातावरण असते, तेव्हा आरोग्यसेवा व आवश्यक उपभोग्य वस्तू क्षेत्र अधिक स्थिरतेमुळे महत्त्व प्राप्त करतात.

बंधन एएमसीमध्ये आमचा बिझनेस सायकल फंड एक शिस्तबद्ध क्षेत्रीय दृष्टीकोन दाखवतो. सध्या आरोग्यसेवा, औषधनिर्मिती, औद्योगिक आणि मूलभूत पायाभूत सुविधा ही लक्ष केंद्रे आहेत. हे क्षेत्र निवडणे हे व्यापक आर्थिक कल, सरकारी धोरणे आणि रचनात्मक प्रवाह यांच्या आधारावर झाले आहे. उदाहरणार्थ, पायाभूत सुविधांच्या वाढीसाठी धोरणात्मक पातळीवर प्रोत्साहन दिले जात आहे, ज्याचा परिणाम सिमेंट, कॅपिटल गुड्स आणि लॉजिस्टिक्स या संबंधित क्षेत्रांवर होत आहे. आरोग्यसेवा आणि औषध क्षेत्रामध्ये लोकसंख्येचे बदल, आरोग्याविषयी जागरूकता आणि दर्जेदार उपचारांची वाढती मागणी हे वाढीस चालना देत आहेत. त्यामुळेच आमच्या फंडाचे या क्षेत्रातील एलोकेशन त्याच्या बेंचमार्कपेक्षा जवळपास दुप्पट आहे.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन रविवारी

छत्रपती संभाजीनगर दि. ११ : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन रविवार (दि.१५) रोजी संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले असून या अधिवेशनात मरठवाड्यातून पत्रकार दाखल होणार आहेत. या अधिवेशनात मराठवाड्यातील कर्तुत्ववान पत्रकारांना मराठवाडा भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असून या अधिवेशनाचे उदघाटन सामाजिक न्याय तथा छत्रपती संभाजीनगर चे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते होईल अशी माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष अनिल सावंत यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी जेष्ठ पत्रकार मधुकर अन्ना वैद्य, जिल्हा अध्यक्ष डॉ.छबुराव ताके यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी शांतिगिरी महाराज, दुग्ध विकास, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, जालना च्या पालकमंत्री पंकजा मुंढे, हिंगोली चे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, परभणी च्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. भागवत कराड, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, आमदार प्रदीप जैस्वाल, आमदार प्रशांत बंब, आमदार संजय केणेकर, आमदार संजना जाधव, आमदार अनुराधा चव्हाण, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष जयदीप कवाडे, सोशल मिडिया चे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांची उपस्थिती राहणार आहे तर प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी, राज्य समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव तर विशेष अतिथी म्हणून बंगळूर येथील पूर्णब्रम्ह संस्थेच्या प्रशासकीय संचालिका जयंती कठाळे, अभिनेते योगेश शिरसाट, एबीपी माझा च्या संपादिका सरिता कौशिक यांची उपस्थिती राहील.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १८१/२०२५.

अर्जदार : १. जनाबाई रमेश गोतमारे, वय. ७५ वर्षे, धंदा. घरकाम, २. बापु रमेश गोतमारे, वय, ४५ वर्षे, धंदा. शेती, ३. संजय रमेश गोतमारे, वय. ४० वर्षे, धंदा, शेती, ४. पल्लवी ज्ञानेश्वर गोतमारे, वय. ३२ वर्षे, धंदा. घरकाम, सर्व रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाटी ॲड. वाय.आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत रमेश रामलाल गोतमारे हे दि. १४/०८/२०२४ रोजी मौजे. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत रमेश रामलाल गोतमारे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– २३/०७/२०२५.

आज दि. १३/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणा न्यायालय क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद,**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १८३/२०२५.

अर्जदार : १. दामु तुकाराम निकम, वय, ७७ वर्षे, धंदा, शेती, २. ज्योतीबाई श्रीराम निकम, वय. ५३ वर्षे, धंदा. शेती, दोघेही रा. काळेनगर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ३. द्वारकाबाई भगवान निकम, वय. ६० वर्षे, धंदा. शेती, रा. पिंपळगांव बु., ता. पाचोरा, जि. जळगांव.

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें वावत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत तुकाराम गणपत निकम हे दि. २४/११/२००४ रोजी मोजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत तुकाराम गणपत निकम यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाटी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– २४/०७/२०२५.

आज दि. १३/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणा न्यायालय क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १८०/२०२५.

अर्जदार : १. दिलीप राजमल बिर्ला वय. ६५ वर्षे, धंदा, शेती, २. विजय राजमल बिर्ला, वय. ६२ वर्षे, धंदा. शेती, ३. संजय राजमल बिलां, वय. ५८ वर्षे, धंदा, शेती, ४. सुनिल राजमल बिर्ला, वय. ५६ वर्षे, धंदा. शेती, ५. निकेश राजमल बिर्ला, वय. ५५ वर्षे, धंदा. शेती, सर्व रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर,

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें वावत,

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाटी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत इंदुबाई राजमल बिर्ला या दि. १५/०४/२०२५ रोजी मोजे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत इंदुबाई राजमल बिर्ला यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल, पुढील तारीख :– २२/०७/२०२५.

आज दि. १३/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणा न्यायालय क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १८२/२०२५.

अर्जदार : १. प्रभावती दामोधर काळे, वय, ७५ वर्षे, धंदा. घरकाम, २. बबलु दामोधर काळे, वय. ५७ वर्षे, धंदा. शेती, ३. सुनिल दामोधर काळे, वय. ४० वर्षे, धंदा. शेती, सर्व रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ४. कल्पनाबाई सुनिल पाटील, वय. ४७ वर्षे, धंदा, घरकाम, रा. वाकी, ता. जामनेर, जि. जळगांव.

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाटी ॲड. वाय.आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत दामोधर पांडुरंग काळे हे दि. २७/०४/२०२४ रोजी मौजे. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत दामोधर पांडुरंग काळे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– २३/०७/२०२५.

आज दि. १३/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणा न्यायालय क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ३६५/२०२५ पु.दि.०१/०७/२०२५

अर्जदार : १. काशिबाई वेणुनाथ सोनवणे, वय. ५२ वर्ष धंदा. शेती रा. कनकोरी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. वेनुनाथ रघुनाथ सोनवणे, वय. ७३ वर्ष धंदा. शेती रा. कनकोरी ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

–: विरूद्धः–

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण – कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, अर्जदार यांचा मुलगा नामे अरूण वेनुनाथ सोनवणे हा दि. २७/०२/२०२५ रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, छ. संभाजीनगर ता.जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाला आहे. अर्जदार यांचा मुलगा अविवाहीत मयत झाला असल्याने अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही व अर्जदार हे मयत अरूण वेनुनाथ सोनवणे यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत अरूण वेनुनाथ सोनवणे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुवित करण्यात येते की, मयत अरूण वेनुनाथ सोनवणे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुट्टीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत अरूण वेनुनाथ सोनवणे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहाय्यक अधिकक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ३४३/२०२५

अर्जदार: १. उषा विश्वनाथ धुमाळ, वय. ४३ वर्षे धंदा. शेती २. अभिषेक विश्वनाथ धुमाळ, वय. २४ वर्षे धंदा. शेती १ व २ रा. खादगांव पो. गाजगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. गीता गणेश परभणे वय. २६ वर्षे धंदा. शेती रा. भेंडाळा ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

–: विरूद्ध :–

गैरअर्जदार: निरंक

प्रकरण : कलम ३७२ भारतीय वारसा कायद्यानुसार उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार क. १ ते ३ यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत उत्तराधिकारी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. अर्जदार नं. १ चे पति व अर्जदार नं. २ व ३ यांची वडिल नामे विश्वनाथ म्हैपती धुमाळ हे दि. २२/०५/२०२४ रोजी मौजे खादगांव ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत विश्वनाथ म्हैपती धुमाळ यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत त्यांच्या व्यतिरीक्त दुसरे कोणीही वारस नाही.

असे की, असे की, मयत विश्वनाथ म्हैपती धुमाळ यांचे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा लासूर स्टेशन (IFSC CODE- SBIN0017677) येथे खाते नं. ३५३४४२७५३६३ असलेल्या खात्यात रक्कम रूपये ७२,४९२/– आहे. अर्जदार हे मयत विश्वनाथ म्हैपती धुमाळ यांचे कायदेशीर वारस असल्याने सदर रक्कम ही अर्जदार यांना मिळण्याकामी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा लासूर स्टेशन यांनी अर्जदार यांना मा. न्यायालयाच्या उत्तराधिकारी असल्याचे प्रमाणपत्राची (Succession Certificate) याची मागणी केलेली आहे. करीता अर्जदारांना मयत विश्वनाथ म्हैपती घुमाळ यांच्या (Succession Certificate) उत्तराधिकारी असल्याचे प्रमाणपत्राची कार्यालयीन कामासाठी आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, मयत विश्वनाथ म्हैपती धुमाळ हे दि. २२/०५/२०२४ रोजी मौजे खादगांव ता. गंगापूर येथे मयत झाले आहे व त्यांचे अर्जदार हे एकमेव कायदेशिर वारस आहेत अर्जदारांना त्यांचे (Succession Certificate) उत्तराधिकारी प्रमाणपत्र देण्यास कोणास काही एक हक्क संबंध व उजर आक्षेप असल्यास त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे ३० दिवसाचे आत लेखी उजर, आक्षेप या न्यायालयात सादर करावा. नसता अर्जदार नं. १ ते ३ हे मयत विश्वनाथ म्हैपती धुमाळ यांचे वारस असल्याचे उत्तराधिकारी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल व मुती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहायक अधिकक्षक

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १६७/२०२५.

१. रुख्माबाई सुपडु घनगाव, वय ८४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ.संभाजीनगर.

२. अशोक सुपडु घनगाव, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ, संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सुपडू दगडू घनगाव यांचा दिनांक १९/१२/२०२४ रोजी सोयगांव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत सुपडू दगडू घनगाव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २७/०५/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १६/०८/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. १२५/२०२५

अर्जदारः लुकमान यासिन शेख, वय–५९ वर्षे, धंदा शेती, ह.मु. सी.टी.एस. नं. ३९५१/९ फ्लॅट नं. ४०५, ४०६ चौथा मजला, ताहीर रेसिडेन्सी, अभुजी कंपाउंड, श्रीदेवी ज्वेलर्स च्या बाजुला, वाडा रोड, भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे. २. रुमशादबी मजिद शेख, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. हाउस नं. ४०/६६, वाडा रोड, म्हाडा कॉलनी, व्ही.टी.सी. भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे. ३. समसुदबी रज्ञाक शेख, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. सातगांव, ता. पाचोरा, जि. जळगांव. ४. शखवातबी मूसा शेख, वय ७४ वर्षे, धंदा घरकाम, रा. अनिश शेख चावळ, नंदी नाका, युपी हॉटेल, व्ही. व्ही.सी. भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे.

विरूध्द

गैरअर्जदारः कुणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. एस. डी. पाटील, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत यासीन नुरमोहम्मद शेख हे दि. ०५/१२/१९७१ रोजी मेणगांव, ता. जामनेर, जि. जळगांव व बानोबी यासीन शेख ह्या दि. २५/०७/१९९५ रोजी भिवंडी, ता. भिवंडी येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. वरील सर्व अर्जदार हे मयत यासीन नुरमोहम्मद शेख व बानोबी यासीन शेख यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख – १५/०७/२०२५.

आज दि. ११/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १७८/२०२५.

१. शिलाबाई उत्तमराव सोनवणे, वय ५८ वर्षे, धंदा मजुरी, रा. गलवाडा (सो). ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर ह. मु. आंबेडकर पार्क, ता.जि. भोपाल. २. नवल उत्तमराव सोनवणे, वय ३५वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे. ३. अजय उत्तमराव सोनवणे, वय ३१ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे. ४. ललीता राहुल साळवे, वय ४० वर्षे, धंदा मजुरी, रा. अरेरा कॉलनी, ता. व जि. भोपाल.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत उत्तम (उत्तमराव) सांडु सोनवणे यांचा दिनांक ०९/०५/२०२१ रोजी पिपल्स हॉस्पीटल भोपाल येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत उत्तम (उत्तमराव) सांडु सोनवणे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १२/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पुःता. २५/०७/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद (या कळमकर साहेब यांचे कोर्ट )**

Civil Misc. Application No. ३९३/२०२५

बाळासाहेब परसराम शिंदे व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत परसराम आसाराम शिंदे यांचा मृत्यु गंगापुर येथे दि. १४/०९/२०१४ रोजी झाला असुन मयत शांताबाई परसराम शिंदे यांचा मृत्यु गंगापुर येथे दि. ०८/०६/२००९ रोजी झालेला असुन अर्जदार नं. १. बाळासाहेब परसराम शिंदे, रा. गंगापुर, ता.गंगापुर जि. औरंगाबाद २. सुनिता रमेश शिंदे, ३. सुनिल रमेश शिंदे, ४. विनायक रमेश शिंदे, ५. मनोज परसराम शिंदे, अर्जदार नं. २ ते ५ रा. गणपती मंदिर जवळ, जाधव गल्ली, गंगापुर, ता. गंगापुर जि.औरंगाबाद ६. लक्ष्मीबाई पोपट भागवत, रा. कांगोणी, ता. नेवासा जि. अहमदनगर यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.पी.बी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदारांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.११/०६/२०२५

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापूर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

**मा. अग्रवाल मॅडम यांचे कोर्टात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३९४/२०२५

शोभा भ्र.एकनाथ काकडे व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत एकनाथ मारोती काकडे हे दि.१९/०९/२०१० रोजी मौजे विटावा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले अर्जदार नं. १) शोभा भ्र.एकनाथ काकडे, रा.विटावा, ता. गंगापुर जि.औरंगाबाद २) उमा भ्र.राहुल खंडाळे, रा. पिंपळगाव वळण, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद ३) आकाश पिता एकनाथ काकडे, रा.विटावा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदारांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे. आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.११/०६/२०२५

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहिर प्रकटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १७६/२०२५.

१. कोमल आधार जाधव, वय ३८ वर्षे, धंदा शेती, रा. पोहरी बु. ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. रोहीदास आधार जाधव, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. आधार चिंतामण जाधव, वय ६१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नवसराबाई आधार जाधव यांचा दिनांक १८/०१/२०२५ रोजी विघ्नहर्ता हॉस्पीटल पाचोरा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ३ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत नवसराबाई आधार जाधव यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १२/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २४/०७/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक सहायक अधिक्षक

दिवाणी, फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहीर प्रगटण

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनर**

सिव्हिल एम.ए. क्र.३३४/२०२५

अर्जदार : १) ताराबाई लक्ष्मण गवळी, वय ४२ वर्षे धंदा शेती, रा. आसेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) सौ. मोनिका मनेश हिवाळे, वय २८ वर्षे धंदा घरकाम रा. गाजगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. दुर्गा अक्षय जाधव वय २७ वर्षे धंदा घरकाम रा. माळीवाडगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए. एस. इंगळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ व ३ ह्या आपसांत नात्याने सख्या बहिणी असुन अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे लक्ष्मण महादु गवळी हे मौजे आसेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक १७/१०/२०२४ रोजी मौजे आसेगाव ता. गंगापुर येथे मयत झाले आहे. मयत लक्ष्मण महादु गवळी यांना अर्जदार क्र.१ ते ३ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप –उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १२/०६/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक १८/०६/२०२५ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापुर

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ३१९/२०२५

अर्जदार: १. आशिष कैलास रोकडे, वय.२८ वर्ष भंदा. शेती रा. मांजरी ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर २. दिक्षा भ्र. सनी क्षीरसागर, वय. २३ वर्ग धंदा. शेती रा. स.नं. १०३, जयप्रकाश नगर, गांधी नगर, पुणे, ता.जि.पुणे

–: विरूद्धः–

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की, असे की. अर्जदार यांचे वडिल नामे कैलास किसन रोकडे हे दि.२१/११/२०२४ रोजी मौजे प्रवरासंगम ता. नेवासा जि. अहमदनगर येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार यांची आई नामे संध्या कैलास रोकडे ही देखील दि.०२/०७/२०२२ रोजी मौजे प्रवरासंगम ता. नेवासा जि. अहमदनगर येथे मयत झाली आहे. अर्जदार हे मयत कैलास किसन रोकडे व मयत संध्या कैलास रोकडे यांचे एकमेव कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत कैलास किसन रोकडे व संध्या कैलास रोकडे यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत कैलास किसन रोकडे व संध्या कैलास रोकडे यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुट्टीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत कैलास किसन रोकडे व संध्या कैलास रोकडे यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुदूती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# अहमदाबादच्या विमान अपघाताचा अन्वयार्थ

१२ जून २०२५ हा तसा नेहमीचाच दिवस होता. काहीही खास घडलेले नव्हते आणि घडण्याची अपेक्षाही नव्हती. मात्र, अहमदाबादची १२ जूनची दुपार दुर्दैवी ठरली. तेथील सरदार पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून लंडन गॅटविक विमानतळासाठी एअर इंडियाच्या एका बोईंग विमानाने (७८७ ड्रिमलाईनर) उड्डाण केले आणि अवघ्या काही मिनिटांतच ते एका वसतिगृहावर कोसळले. या घटनेत २०० वर जणांचा जीव गेला आणि ज्या इमारतीवर ते कोसळले, त्यातील लोकही मृत्युमुखी पडले. या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करतानाच, अशा अपघातांची पुनरावृत्ती होऊ नये, याची काळजी घेण्याचाही विचार केला पाहिजे. हे विमान दीर्घ पल्ल्याच्या प्रवासासाठी, अर्थात हजारो किलोमीटर उड्डाण करण्यासाठी भरपूर इंधन भरून सज्ज केले गेले होते. उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटांत ते वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहावर कोसळले तेव्हा ते फार तर ६०० फुटांच्या उंचीवर होते आणि त्याचा वेगही ४०० फूट प्रति मिनिट एवढाच होता. तरीही ते कोसळले, याचा प्राथमिक अर्थ काही तरी मोठा तांत्रिक दोष असला पाहिजे. या अपघाताने प्रवाशांसह एकूणच एव्हिएशन सेक्टरमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे आणि त्यामुळेच तो आपल्या अर्थकारणासाठी चिंतेचा विषय आहे.

गेल्या शतकभरात विमानांचे असे अनेक अपघात झाले. हजारो लोकांचे जीव गेले. या काळात एव्हिएशनच्या क्षेत्रात चांगली तांत्रिक प्रगतीदेखील झाली. अलिकडे असे अपघात घडण्याचे प्रमाण कमी झाले. तरीही असे काही घडले की घबराट पसरतेच. हजारो मीटर उंचीवर असलेल्या विमानात बसून कोणत्याही आधाराविना लांब पल्ल्याचा प्रवास करताना जीव टांगणीला लागलेला असतोच. परंतु, प्रवाशांना वैमानिकांवर आणि त्यांच्या कौशल्यावर विश्वास असतो. त्यामुळे ते निर्धास्त असतात. असे अपघात या विश्वासाला तडा देत असतात. या विमानातील दोन्ही वैमानिक अनुभवी होते. विमानही जेमतेम दशकभरापूर्वी सेवेत आलेले. तरीही ते कोसळले. प्राथमिक माहितीनुसार तांत्रिक बिघाड हे विमान कोसळण्याचे कारण सांगितले गेले आहे. 'तांत्रिक बिघाड' हा शब्द उड्डाण क्षेत्रात फार गुंतागुंतीचा मानतात. संदेश वहनातील किरकोळ समस्यांपासून ते हायड्रॉलिक बिघाड, इंजिनमध्ये समस्या किंवा केबिन प्रेशर कमी होणे यासारख्या गंभीर समस्यांपर्यंत काहीही घडलेले असू शकते. जे काही घडले असेल, ते गंभीरच असले पाहिजे व ते फार वेगाने आपत्तीत परिवर्तित झाले असले पाहिजे. कारण आपण संकटात असल्याची माहिती देण्यासाठी किंवा विमान वाचविण्याचा प्रयत्न करण्यासाठी वैमानिकांना वेळच मिळाला नाही. एक डिस्ट्रेस कॉल तेवढा नोंदविला गेला. बोईंगमध्येच नव्हे तर कोणत्याही विमानात अशा प्रकारचा तांत्रिक दोष असू शकतो आणि त्यामुळेच भारतातील सर्व नागरी प्रवासाची विमाने पूर्णपणे तपासून घेण्याचा प्रसंग आलेला आहे. कारण, नागरी विमान वाहतूक क्षेत्राची प्रतिष्ठा या घटनेमुळे पणाला लागली आहे.

गेल्या दोन दशकांत भारतातील हवाई वाहतुकीत मोठी वाढ झाली आहे. कोट्यवधी देशांतर्गत प्रवाशांसह भारत हे जगातील तिसरे सर्वांत मोठे सिव्हिल एव्हिएशन मार्केट. भारतातील सिव्हिल एव्हिएशन (नागरी विमान वाहतूक) हे जगात सर्वांत वेगाने वाढणारे देशांतर्गत विमान वाहतूक क्षेत्र. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातील आणि रोजगारातील या क्षेत्राचा वाटाही मोठा. त्या वाढीसोबत आव्हानेही आली आहेत. विमानतळांची दुरवस्था, धावपट्ट्यांची स्थिती, जास्त वेळ व बिनचूक काम करण्याची क्षमता असलेले हवाई वाहतूक नियंत्रक असे अनेक विषय आहेत. विमानांचे सुरक्षाविषयक मापदंड आणि विमान सेवा देणाऱ्या कंपन्यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी हेही विषय आहेत. एअर इंडियाचे २०२२ मध्ये टाटा समूहाने अधिग्रहण केल्यानंतर त्यांनी पुनर्रचनेचे बरेच प्रयोग सुरू केले. त्यांनी सुरक्षाविषयक मापदंडांचे पालन करण्याच्या संदर्भात पुरेसे लक्ष दिले काय? हे आता तरी शोधले पाहिजे. एअर इंडिया कंपनी भारत सरकारच्या ताब्यात असताना प्रचंड तोट्यात होती. गेल्या काही दशकांत तर त्याचा दर्जा अत्यंत खालावला होता. त्याचा परिणाम प्रवासी सेवेवर झाला होता. आता ते पुन्हा सावरत असताना हा अपघात घडला. या अपघातामागील कारण व्यवस्थापकीय अनागोंदीत तर दडलेले नाही ना, याचाही शोध घेतला गेला पाहिजे. बोईंग ७८७ ड्रीमलाईनर हे विमान इंधन कार्यक्षमता, लांब पल्ल्याच्या आरामदायी प्रवासासाठी प्रसिद्ध आहे. तरीही त्यातील तांत्रिक समस्यांची चर्चा अनेकदा जगभर झालेली आहे. क्वालिटी कंट्रोलच्या तक्रारी ते स्पेअर पार्ट्स कमी दर्जाचे असल्याबाबतच्या कहाण्या चर्चेत आलेल्या आहेत. सध्या तरी या अपघाताशी यापैकी कोणत्याही घटकाचा थेट संबंध असल्याचे ठामपणे म्हणता येत नाही. मात्र, यानिमित्ताने या विमानाच्या उड्डाणविषयक विश्वासार्हतेसाठी बारकाईने तपासणी होणे आवश्यक आहे. आजच्या युगात विमान प्रवास करणे ही असंख्य लोकांची गरज आहे. त्यामुळे झालेल्या अपघाताचा तपास करणे, मृतांच्या कुटुंबीयांना सांत्वना व मदत देणे हे करतानाच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याचीही काळजी घेतली गेली पाहिजे. अशा घटनांना मिळणारा आपला संस्थात्मक प्रतिसादही व्यक्तींच्या प्रतिसादासारखा भावनिक तेवढा असतो. तो तर्कशुद्धच असला पाहिजे. नागरी उड्डाण महासंचालनालय, एअर इंडिया आणि अशा सर्व संस्थांनी मिळून प्रयत्न केले तर या अपघाताचे नेमके कारण कळेल आणि भविष्यातील अपघात टाळण्यासाठी उपाय होऊ शकतील. या विमानात भारतासह ब्रिटन, कॅनडा, पोर्तुगाल इत्यादी देशांतील नागरिक होते. त्यामुळे त्या देशांच्या यंत्रणांचाही तपासात सहभाग घ्यायला हरकत नसावी. काही वर्षांपूर्वी कोझिकोड येथे झालेल्या एअर इंडिया एक्सप्रेस विमानाच्या अपघातानंतर चौकशीकर्त्यांनी ऑपरेशनल आणि पायाभूत सुविधांमधील त्रुटींकडे लक्ष वेधले होते. तरीही अनेक विमानतळांवरील परिस्थिती अद्याप सुधारलेली नाही. उड्डाण क्षेत्रात प्रवाशांची सुरक्षितता सर्वोपरी असली पाहिजे. या घटनेचा धडा घेऊन भारताने बहुस्तरीय विमान वाहतूक सुरक्षा सुधारणा सुरू केल्या पाहिजेत. भारतात कार्यरत असलेल्या सर्व बोईंग ७८७ विमानांसह अन्य सर्व नागरी विमानांची त्वरित तपासणी, वैमानिकांचे पुनःप्रशिक्षण आणि मानसिक तंदुरुस्तीची तपासणी, विमान सेवेतील अडचणींची माहिती घेणे व सुधारणा करणे, एटीसीच्या सुविधांमध्ये सुधारणा करणे, चांगले रडार कव्हरेज सुनिश्चित करणे आणि सुरक्षा प्रोटोकॉल्सचे जागतिक मानकांनुसार अद्ययावतीकरण करणे अशा कित्येक पातळ्यांवर हे काम करावे लागेल. भारतीय विमान वाहतूक क्षेत्राचा संबंध अनेक आंतरराष्ट्रीय करार, विमान उत्पादक आणि हवाई वाहतूक प्रोटोकॉलशी आहे. असा केवळ एक अपघात जागतिक स्तरावर प्रतिक्रिया निर्माण करणारा ठरतो. त्याचा परिणाम त्या देशाच्या समस्त उड्डाण क्षेत्रावर होतो. त्याची विश्वासार्हता पणाला लागते. सुरक्षित, विश्वासार्ह विमान वाहतूक सेवा राबविणारा देश म्हणून भारताची प्रतिष्ठा पणाला लावणारा हा अपघात आहे. जगातील प्रगत विमान वाहतूक यंत्रणा व संस्था सुरक्षिततेच्या सर्वोच्च मापदंडांवर निरंतर काम करीत असतात. छोट्या चुका, त्रुटी किंवा अन्य समस्या संकट येण्याआधी लक्षात घेतल्या जातात आणि त्यावर उपाय केले जातात. भारतात ते स्टँडर्ड्स पाळले जातात काय, याची पडताळणी करण्याचा हा प्रसंग आहे. नागरी उड्डाण महासंचालनालयाला अनेकदा शक्तिहीन (टूथलेस) नियामक यंत्रणा म्हणून हिणविले जाते. या यंत्रणेकडून सुरक्षेच्या आंतरराष्ट्रीय मापदंडांचे पालन होत नसल्याची जाहीर चर्चाही झाली होती. जाणकार असे म्हणतात की, त्यामुळेच भारतीय विमान सेवांच्या आंतरराष्ट्रीय उड्डाणांना अद्याप मर्यादा आहेत. अमेरिकेसारख्या देशांतील विमान कंपन्यांशी कोड शेअरिंग करण्याचे प्रस्तावही प्रलंबित आहेत. अशा सर्व विषयांचा सर्वंकष आढावा घेऊन आपले एव्हिएशन सेक्टर मजबूत करणे, हा या अपघाताचा धडा आहे. इतिहास आपल्याला नेहमीच एक पर्याय देत असतो. आपत्तीतून शिकायचे की तिची पुनरावृत्ती करायची...? शहाणे लोक शिकण्याचा पर्याय निवडतात आणि अज्ञानी पुनरावृत्तीच करतात. आपण कसे आहोत, हे येणारा काळ सांगेल.

## दृष्टिक्षेप

विजय पांढरीपांडे

# पैसा आहे म्हणून उधळपट्टी बरी नव्हे!

नातवाचा वाढदिवस झाला. सहज विचारले मुलीला. तिने आकडा सांगितला. तो ऐकून धक्काच बसला! वाढदिवसासाठी, दोन-तीन तासासाठी एवढा खर्च? त्याची खरंच गरज आहे का? भेटवस्तूंची देवघेव, बाहेरून मागवलेल्या फास्ट फूडचा फडशा, तेवढ्या वेळपुरता धांगडधिंगा यातून कुणाला किती खरा शाश्वत आनंद मिळतो? आम्ही मुलांसाठी हे करतो, ते करतो या खोट्या समाधानासाठी, देखाव्यासाठी हे सारे चालले असते का? यात भाग घेणाऱ्या मुलांना यातून नेमके काय मिळते? खरेच ही मैत्री असते का? या मुलांना एकमेकांविषयी प्रेम, स्नेह, लळा, जिव्हाळा आहे का? ते गरज पडल्यास एकमेकांना मदत करतात का? एकमेकांच्या अभ्यासातल्या किंवा इतर समस्या सोडवायला तत्परतेने पुढे येतात का? एखाद्या कुटुंबात कुणी आजारी पडले तर मुलं सहानुभूती दाखवतात का? या मैत्रीचे नेमके अर्थ, स्वरूप असते तरी कसे? किती खोल, किती वरवरचे? किती ओले, किती कोरडे? विचार करण्याची वेळ आली आहे.

आता प्रत्येक घरात पैसा खेळायला लागला आहे. भारत गरीब देश आहे हा भूतकाळ झाला. आता घरात प्रत्येकाकडे महागडा मोबाईल आहे. अगदी कामवालीबाई, भाजीवाली, कचरा गोळा करणारा कर्मचारी... प्रत्येकाकडे स्मार्ट फोन आहे महागडा! विमानतळावर आता एसटी स्टँडसारखी गर्दी असते. जन्म झालेले छोटे मूल विमानाने प्रवास करायला लागले आहे. मौजमजा करायला ना नाही. आम्ही काही केले नाही म्हणून तुम्हीही ते करू नये, असा दुराग्रहदेखील नाही. प्रश्न संस्काराचा आहे. मुलांना शिकवायचे काय अन् आपण शिकवतो काय, हा मूलभूत प्रश्न आहे. एकीकडे आपणच तक्रार करतो. मुले ऐकत नाहीत. मुले हाताबाहेर चालली. मुले हट्टी-मुजोर झालीत; पण या साऱ्याला जबाबदार कोण? आज प्रत्येक जण आपापल्या विश्वात मग्न आहे. प्रत्येक जण आपल्या संकुचित वर्तुळाच्या स्पेसमध्ये व्यस्त आहे. ज्या प्रमाणात मुलांना वेळ द्यायला पाहिजे त्या प्रमाणात तो देण्यास ही तरुण जोडपी असमर्थ आहेत. त्यामुळे त्यांनी आपल्या पाल्य कर्तव्याची व्याख्याच बदलून टाकली आहे. त्यांना हवा तसा हवा तिथे पैसा फेका अन् व्हा मोकळे, अशी सुटका करून घेण्याची सोयीस्कर वृत्ती झाली आहे. लाखो रुपये फी, डोनेशन असलेल्या शाळेत प्रवेश, वेगवेगळ्या क्लासेसची हजारोंची फी, हवा तितका पॉकेटमनी, हवी ती खेळणी, हव्या त्या फॅशनचे ब्रँडेड महागडे कपडे अशा चैनीची सवय आतापासूनच मुलांना पालकांनी लावली आहे. त्यात या मुलांचा काही दोष नाही. पालकांचा स्वार्थ आहे. त्यांना हवे समाधान हवे आहे. हा खर्च ते गरज आहे म्हणून करत नाहीत. आता वाढदिवसासाठी एवढा खर्च करण्याची मुळातच गरज नाही, हे या पालकांनादेखील माहिती आहे. आपल्याला हे असे मिळाले नव्हते, आपले असे इतके लाड पुरवले गेले नव्हते ही एकीकडे खंत आहे अन् आपल्याला मिळाले नाही ते आपल्या मुलांना द्यायचेच! (त्यांना काय हवे हे न विचारता, त्याची चिंता न करता) ही जिद्द आहे. शिवाय सोशल स्टेट्सच्या स्पर्धेचा दबाव आहे तो वेगळाच! यामुळे मुले लाडवतात, हट्टी होतात याची त्यांना पर्वा नाही.

फार कमी पालक आहेत जे मुलांना वाचनाची आवड लावतात. गोष्टी सांगतात. पुस्तके वाचून दाखवतात. एखाद्या खेडे गावात, निसर्गाच्या सान्निध्यात मुलांना फिरायला घेऊन जातात. चांगले नाटक, छान कौटुंबिक चित्रपट, नृत्य, लोककला अशा विविध सांस्कृतिक दालनाची मुलांना ओळख करून देतात. आपल्याच देशात किती तरी ऐतिहासिक, पौराणिक, सांस्कृतिक, शैक्षणिक स्थळे आहेत. हवे तर अशा ठिकाणी घेऊन जावे मुलांना. यातून त्यांना खरे जग दिसेल. क्षणिक पार्टीचे समाधान अन् जन्मभर लक्षात राहील, असा शाश्वत आनंद यातला फरक मुलांना कळला पाहिजे. पालकांनी आपल्या कृतीने, व्यवहाराने तो समजावला पाहिजे.

मुलांना पैशाचे महत्त्व कळू द्या. आजूबाजूची परिस्थिती, नात्याचे महत्त्व, एकमेकांना मदत करण्याची भावना हे सारे रुजवणे जास्त गरजचे आहे. केवळ मॉल संस्कृती, विमान प्रवासाची ऐश हे पुरेसे नाही. आपल्या घरी काम करणारी मावशी, वॉचमनची ड्युटी करणारे काका, त्यांच्या घरची परिस्थिती, त्यांच्या मुलांच्या अडचणी याची त्यांना जाणीव होणे गरजेचे आहे. एवढा खर्च करणाऱ्या वाढदिवसाच्या पार्टीत रोज तुमच्या घरी काम, स्वयंपाक करणाऱ्या काकूंच्या मुलांना निमंत्रण का नको? माणूस या नात्याने सर्व सारखे हा भाव त्यांच्या मनात कधी रुजणार? की, समाजातील गरीब-श्रीमंत, ही जात ती जात हे भेदभाव जोपासण्यात तुमच्या मुलाची वाढ होणार? संस्काराचा नेमका अर्थ काय हे कळायला हवे, ठरवायला हवे.

मैत्रीचा खरा अर्थ मुलांना कळू द्या. मनात आस्था हवी एकमेकांविषयी. परोपकाराची भावना हवी. मदत करण्याची वृत्ती हवी. कृतज्ञ भाव असावा. एरवी आता जे चित्र ते बघतील ते अंतिम सत्य समजून ते आयुष्याची वाटचाल करतील. त्यांना खऱ्या जीवनाची ओळख होणारच नाही कधी. ते कुटुंब वत्सल, संवेदनशील, जागरूक, जबाबदार नागरिक बनण्यास असमर्थ ठरतील, हे आपल्या कुणालाही अपेक्षित नसणार. आज घरची कौटुंबिक नाती-गोती पार दुरावली आहेत. अगदी लग्न समारंभालादेखील टू बिझीच्या नावाखाली पळवाट शोधली जाते. घरच्या सणावाराला फार कमी कुटुंब एकत्र जमतात आजकाल. त्यामुळे आपलेच नातेवाईक मुलांना अपरिचित झाले आहेत. कधी कुठे चुकून भेट झाली तर सख्ख्या नात्याची मुलांना ओळख करून द्यावी लागते. कुटुंब म्हणजे आपण दोघे, आपले दोघे. अगदी काही ठिकाणी आजी-आजोबादेखील दुरावले आहेत. व्हॉट्सअॅप व्हिडीओ कॉलपुरते कधीतरी एकदा असे मर्यादित झाले आहेत. मुलांचे वाढदिवस, कुणाचे लग्न, कुणाच्या यशाचे सेलिब्रेशन या निमित्ताने तरी एकत्र या दोन दिवस. मुलांना नात्याचे महत्त्व कळू द्या. आधीच्या पिढीची, त्यांच्या वेळच्या काळाची थोडी ओळख करून द्या. इतिहास फक्त राजेराजवाडे यांचाच नसतो. आपल्या स्वतःच्या घराण्याचादेखील इतिहास असतो. परंपरा असते. कुळाचार असतो. त्यांच्याही यशापयशाच्या कहाण्या असतात. त्या आपल्या मुलांना, नव्या पिढीला कळायला नकोत? मग एकत्र आल्याशिवाय, त्याकरिता मुद्दाम वेळ काढल्याशिवाय ते कसे शक्य होणार?

आपण नेहमीच पाश्चात्त्य संस्कृतीला नावे ठेवण्यात धन्यता मानत आलो, पण आपणही त्याच मार्गाने वाटचाल करीत त्यांनाही मागे टाकत पुढे चाललोय की काय, अशी भीती वाटते. भारत नंबर वनच्या स्पर्धेत अशा स्पर्धा घातक ठरतील, हे आता तरी आपल्याला कळायला हवे. संस्कृती गहाण ठेवणे हे दारिद्र्याचे लक्षण आहे. हा डोस कडू असला तरी गरजेचा आहे.

७६५९०८४५५५

## दखल

मोरेश्वर बडगे

# हे भाऊ, काका-पुतणे एकत्र येतील?

त्या गोष्टीला दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ लोटला असेल. प्रसिद्ध दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे म्हणजे 'मनसे'चे सुप्रीमो राज ठाकरे यांची मुलाखत घेतली होती. ही मुलाखत फार आधी रेकॉर्ड झाली होती. मुलाखत दाखवायला सुरुवात झाली तेव्हा राज ठाकरे विदेश दौऱ्यावर निघून गेले होते. ती मुलाखत अजूनही महाराष्ट्राच्या राजकारणात धुमाकूळ घालते आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोन मावस भाऊ एकत्र येतील का? असा एक प्रश्न या मुलाखतीत राज ठाकरे यांना विचारण्यात आला होता. 'महाराष्ट्राच्या हितापुढे आमचे मतभेद क्षुल्लक आहेत' असे उत्तर राज ठाकरेंनी दिले होते. भावाच्या या टाळीला उद्धव ठाकरेंनीही लगेच सकारात्मक प्रतिसाद दिला. 'महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल' असे उद्धव म्हणाले. त्या नंतर हे दोन भाऊ एकत्र येतील का? याचीच चर्चा सुरू आहे. यात भर पडली ती राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांचे नेते शरद पवार आणि अजित पवार हे काका-पुतणे एकत्र येणार का? या चर्चेची. राजकारणात काहीही होऊ शकते. त्याप्रमाणे तसे काहीही या दोघा-चौघांच्या बाबतीत होईल का? चार महिन्यांनी महापालिकांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर या चर्चेने राजकारण तापले आहे.

दोन भावांनी एकत्र आले पाहिजे, असे त्यांच्या चाहत्यांना वाटते. चांगली गोष्ट आहे. पण तुम्हाला पाहिजे म्हणून कोणी एकत्र येत नाहीत. सुमारे २० वर्षांपूर्वी राज ठाकरे वेगळे झाले. त्या काळात तर बाळासाहेब हयात होते. तरीही राज बाहेर पडले. त्यांनी स्वतःचा महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष काढला. ज्या कारणाने हे दोघे वेगळे झाले ती कारणं संपलीत का? संपली असतील तर एकत्र यायला यांना कोणी अडवलंय? मानापमान गुंडाळून एकत्र येण्याची दोन्हीकडून प्रामाणिक इच्छा आहे का? नुसती इच्छा असून भागणार नाही. राजकीय इच्छाशक्ती लागेल. 'ठाकरे ब्रँड' खरेच वाचवण्याची इच्छा असेल तर ती मनापासून पाहिजे. अशा मनोमिलनाला अटी-शर्ती नसतात. चर्चा प्रामाणिक असेल तर सारे शक्य आहे. मात्र अहंकार मोठा असेल तर सारेच अवघड आहे. सुरुवात कुठून करायची? इथपासून सुरुवात आहे. प्रस्ताव कोणी कुणाला द्यायचा? नव्या व्यवस्थेत बॉस कोण? हे ऐक्य 'बिनशर्त असेल की 'बिनशर्ट?' 'महाराष्ट्र हिता'ची या दोघा नेत्यांची काय व्याख्या आहे? सगळाच संशयकल्लोळ आहे. सध्या निव्वळ प्रसार माध्यमांमध्ये चर्चा आहे. या दोघांकडे एकमेकांचे मोबाईल नंबर्स आहेत. त्यांनी बोलून काय ते ठरवावे. तसे ते दोघे एकमेकांशी बोललेही असतील. महाराष्ट्राला ते कळायला पाहिजे. नेमके तेच बाहेर येत असल्याने संभ्रमावस्था आहे. येत्या १९ जून रोजी शिवसेनेचा स्थापना दिन आहे. त्या दिवशी मराठी माणसाला काही वेगळे पाहायला मिळेल का? मराठी माणसाला वाटते म्हणून हे दोघे नेते एकत्र येतील? आले तर मनसेच्या मतांचा फायदा उद्धव ठाकरे यांना होऊ शकेल? मुंबई महापालिकेची निवडणूक उद्धव ठाकरे यांच्यासाठी प्रतिष्ठेची आहे. ठाण्यामध्ये एकनाथ शिंदे आहेत. त्यामुळे मुंबईसोबत ठाणे महापालिका जिंकण्यासाठी घमासान युद्ध होणार आहे. उद्धव विरुद्ध भाजपा असा हा सामना आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेना युतीला बहुमताचा कौल जनतेने दिला होता. तरीही उद्धव ठाकरेंनी दगाबाजी केली. मुख्यमंत्री होण्यासाठी शरद पवारांकडे गेले. तो दगाफटका भाजपा विसरलेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर मुंबईची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. तशा स्थितीत दोन्ही भाऊ एकत्र आले तरी उद्धव ठाकरेंना मनसेच्या मतांचा फायदा होईल का? भावासाठी उद्धव किती जागा सोडतील? 'मला मुसलमानांची मतं नकोत' असे बाळासाहेब म्हणत. उद्धव यांचे उलटे आहे. शरद पवारांपेक्षा उद्धव अधिक 'सेक्युलर' झाले आहेत. मात्र, मुंबईचं राजकीय गणित बदललं आहे. मुंबईमध्ये २७ टक्के मराठी मतदार आहेत. मात्र इतर समाजाचेही मतदार चांगल्या संख्येने आहेत. गुजराती २२ टक्के आहेत. गुजराती, राजस्थानी, उत्तर भारतीय मिळून सुमारे ५५ टक्के मतदार होतात. परप्रांतीयांबद्दल राज ठाकरेंची भूमिका जगजाहीर आहे. या हवेत दोन्ही भावांच्या एकत्र येण्याचा महायुतीवर परिणाम होण्याची शक्यता अंधुक आहे. हे आकडे राज ठाकरेंकडेही असतील. 'लंगड्या घोड्या'वर स्वार होण्याचा धोका राज ठाकरे पत्करतील?



पवार काका-पुतण्याची केसही तसलीच आहे. दोघे एकत्र येण्याची चर्चा मीडियामध्ये आहे. नुकताच त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचा वर्धापन दिन वेगवेगळा साजरा झाला. त्यात एकत्र येण्याचा विषय कोणीही काढला नाही. काढणारही नाही. काढण्यासाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षात आता उरले तरी काय? ज्या पक्षाचा प्रदेशाध्यक्ष 'मला मोकळं करा' म्हणतो त्यावरून त्या पक्षाचं भवितव्य लक्षात येते. 'मला मोकळं करा' असे सांगण्यासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी वर्धापन दिनाचा मुहूर्त निवडला, यातच सारे आले. 'चार महिने तरी थांबा' असे शरद पवारांना सांगावे लागते, यावरून त्यांच्या राष्ट्रवादीची तब्येत लक्षात येते. शरद पवारांनाही याचा अंदाज आला आहे. 'पक्षफुटीची आपल्याला चिंता नाही; या आधीही आमदार आपल्याला सोडून गेले, तरीही आपले बिघडले नाही' असे पवार नेहमीच सांगत आले. यावेळीही त्यांनी तेच दाबून सांगितले. मात्र जुने दिवस गेले हे पवार ओळखून आहेत. त्यांची खंत वेगळी आहे. मुलीचे करीअर आपण बनवू शकलो नाही, याची त्यांना खंत आहे. वृद्ध पित्याची ही दुखरी नस पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नेमकी हेरली. दिवस कसे बदलतात पहा. याच सुप्रिया सुळे यांनी निवडणुकांआधी 'एक अकेला देवेंद्र क्या करेगा?' असा डायलॉग फेकला होता. त्याच सुप्रिया सुळे यांनी आता 'ऑपरेशन सिंदूर'चे माहात्म्य सांगण्यासाठी विदेशात गेलेल्या एका प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व केले. उद्या त्या केंद्रात मंत्री झाल्या तर आश्चर्य नको. सुप्रिया सुळे आणि शरद पवार हे बापलेक आज वेगळी भाषा बोलताहेत ही मोदींची जुगाड टेक्नॉलॉजी आहे. 'ऑपरेशन सिंदूर'चा हिशेब मागणाऱ्या राहुल गांधी आणि त्यांच्या इंडिया आघाडीचे 'मिसाईल' मोदींनी उडण्याआधीच पाडले. उद्या शरद पवारही 'मोदी है तो मुमकिन है' सांगत फिरले तर आश्चर्य नको. पवार हे 'पोचलेले' नेते आहेत. विचारधारेशी त्यांना काही घेणेदेणे नाही. 'जिधर बम उधर हम' अशा थाटाचे त्यांचे राजकारण राहिले आहे. १९९५ ते २०१४ या काळात चार निवडणुका झाल्या. या चारही निवडणुकीत १०० पेक्षा अधिक जागा मिळविणारा एखादा पक्ष दाखवा. भाजपाच हा विश्वास कमावू शकला. लोकांनी विरोधकांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. भाजपा हाच एक पक्ष आज विश्वासार्ह ब्रँड झाला आहे. भाजपाचे १३२ आमदार आले आहेत. त्यांच्यासोबतच्या महायुतीकडे एकूण २८० आमदार आहेत. कोणत्या राज्यात कोणत्या सत्ता पक्षाला जनतेने एवढी ताकद दिली?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# ...अब दिल्ली दूर नहीं।

गेल्या हिवाळ्यात दिल्लीतील दाट प्रदूषण हा चर्चेचा विषय ठरला. तुऱ्हाटी-पऱ्हाटी जाळून शेतजमीन मोकळी करण्यासह बांधकाम, वाहनांचा वाढता वापर यासारख्या प्रदूषणाच्या कारणांचा विविध स्तरांवर ऊहापोह झाला. एक-दोन पावसाच्या सरींनी दिल्लीतील प्रदूषणाचे कण खाली बसवले आणि सगळं काही आलबेल झालं. पण, दिल्लीवर घोंगावत असलेलं प्रदूषणाचं वादळ मध्य भारतात सर्वात सुरक्षित आणि हिरव्यागार नागपूरकडे झेपावलं आहे. देशातील सर्वाधिक हिरव्या शहरांमध्ये गणल्या जाणाऱ्या नागपूरची नोंद गेल्या तीन महिन्यांत सर्वाधिक प्रदूषित शहर, अशी झाली आहे. दुर्दैवाने पर्यावरणाच्या ऱ्हासाचे हे मापदंड आपणच प्रस्थापित करीत आहोत. सीपीसीबी अर्थात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ताज्या आकडेवारीनुसार, गेल्या तीन महिन्यात म्हणजे फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल महिन्याच्या ८९ दिवसांपैकी ६९ दिवस असे होते की, जेव्हा नागपुरातील हवेचा दर्जा 'खराब' या वर्गवारीत होता. प्रति क्युबिक मीटर हवेत प्रदूषणाचे १०० मायक्रो कण ही एक निर्धारित मर्यादा आहे. मात्र, फेब्रुवारीत ११९, मार्चमध्ये १२२ आणि एप्रिलमध्ये ११३ अशी वाढीव नोंद करण्यात आली. प्रदूषणाचे हे प्रमाण नागरिकांच्या श्वसन यंत्रणेसह थेट हृदयावर प्रभावी विपरीत परिणाम करण्यासाठी पुरेसे आहे. विशेष म्हणजे वर्ष २०२३ आणि २०२४ मध्ये याच महिन्यांत नोंदविलेल्या आकडेवारीपेक्षा हे प्रमाण बरेच जास्त आहे. विशेष म्हणजे नागपूर हे एनसीएपी क्रमवारीतील म्हणजेच राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमात सहभागी अशा महाराष्ट्रातील १९ शहरांपैकी एक आहे. राष्ट्रीय स्तरावर निर्धारित स्वच्छ वातावरणाच्या मापदंडानुसार, प्रदूषण पातळी सातत्याने वाढत असलेल्या शहरांची निवड या उपक्रमांतर्गत करण्यात आली. वेगाने विकसित होणाऱ्या उपराजधानीचा राजधानीतील सर्वाधिक प्रदूषित शहरांमध्ये, मालेगावनंतर दुसरा क्रमांक लागला आहे. परिणामी, श्वसनाशी संबंधित आजार आणि त्रास वाढल्याचे सर्वच जण अनुभवत आहेत.रस्त्यांवर वाढलेली वाहनांची संख्या हा गंभीर मुद्दा आहे. एकेकट्या व्यक्तीसाठी मोठमोठ्या चारचाकी गाड्या नागपूरच्या रस्त्यांवर धावत आहेत. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढला असला, तरी त्यांची संख्या खूपच मर्यादित आहे. सिग्नलवर गाड्या बंद करणे, कार पुलिंग, जवळपासच्या अंतरांसाठी पायी चालणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्यावरणपूरक बसेस आणि मेट्रोसारख्या सार्वजनिक वाहनांचा वापर वाढविण्यासाठी उद्दिष्ट निर्धारित करायला हवंय. घन कचरा व्यवस्थापनाच्या नावाखाली कचरा जाळणं ही नागरिकांची सवय आहे. विशेषतः झाडांचा पाळापाचोळा, कागदपत्रं सर्रास जाळली जातात. शहराच्या कानाकोपऱ्यात सुरू असलेली बांधकामं आणि औद्योगिकीकरणाचा वाढता पसारा या प्रदूषणात भर घालतात. धुळीसह या प्रदूषणाचे कण कोरडा खोकला, घशात सतत खवखव, दमा, ब्रॉकायटिस आणि सीओपीडीसारख्या रोगांसाठी आमंत्रण ठरतात. विशेषतः लहान मुलांमध्ये हे आजार वेगाने पसरून गंभीर होतात. सतत प्रदूषित हवेत राहणाऱ्यांना, त्यांचे वय कितीही असले, तरी मानसिक ताण, नैराश्य आणि चिंता वाढण्यासारखे त्रासही संभवतात, असं तज्ज्ञ सांगतात.

आरोग्यसेवांवर येणारा ताण, विविध आजारांमुळे मनुष्यबळाची उत्पादन क्षमता कमी होण्यासारखे अप्रत्यक्ष परिणाम आहेतच. प्रदूषणाचे हॉटस्पॉट ओळखून, त्यामागच्या कारणांवर युद्धस्तरावर काम करायला हवंय. सोबतच, हवेच्या गुणवत्तेची निरीक्षण केंद्रे आणि डेटा विश्लेषण करून कठोर निर्णय घ्यावे लागतील. राजधानी दिल्लीप्रमाणे ऑड-इव्हन क्रमांकाच्या गाड्यांना रस्त्यावर येण्यास दिवस ठरवून देणे, बांधकामांवर मर्यादित नियंत्रण आणणे यासोबतच प्रत्यक्ष परिणाम देणारे उपाय प्रामाणिकपणे करायला हवे. पण, परिस्थिती अजूनही नियंत्रणात आणली जाऊ शकते. पर्यावरणाचा हा ऱ्हास रोखण्यासाठी भेगाळ आणि उजाड माळरानांवर हिरवाई फुलविण्याचा ध्यास घेणं, हा तातडीने घेण्याचा निर्णय आहे. कोणीतरी तिसऱ्या व्यक्तीने आपल्यासाठी हे करावं, अशी अपेक्षा यापुढे करून चालणार नाही. थोड्या परिश्रमांतून, स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने किंवा त्यांच्याशिवाय, आपापल्या स्तरांवर आपली जबाबदारी आणि नागरी कर्तव्य ओळखून, हा प्लांटेशन ड्राईव्ह करावा लागणार आहे. अर्थात, दिल्ली किंवा मुंबईसारखी प्रदूषणाची वाईट स्थिती नागपुरात अद्याप नाही. पण, संकट दारात येऊन उभं आहे आणि दिल्लीकरांची अवस्था बघताना, हातात वेळ असतानाच शहाणं होण्यास काय हरकत आहे. 'तरुण भारत'ने शताब्दीपूर्तीच्या वर्षात प्रवेश करतानाच 'बीज अंकुरे अंकुरे' आणि 'वसा वटपौर्णिमेचा' हे दोन महत्त्वाचे उपक्रम राबविले. समाजाच्या विचारांना दिशा देणारे असे उपक्रम येणाऱ्या पावसाळ्यात व्यापक स्तरावर अंमलात आणावे लागणार आहेत. सगळ्यांना सगळं समजत आहे, काय करायला हवंय हेसुद्धा माहिती आहे; पण प्रत्यक्षात कागदी घोडे नाचविण्यापलीकडे काहीच होताना दिसत नाहीये. प्रत्येक निर्णयासाठी प्रशासनाच्या तोंडाकडे न बघता, नागरिकांनी स्वतःचा विवेक जागृत ठेवून निर्णय घेण्याची हीच वेळ आहे. हे झालं नाही, तर नागपूरची 'दिल्ली' व्हायला वेळ लागणार नाही.

९८५०३३९२४०

### मोबाईल विद्यार्थ्यांसाठी मारकच

बदलत्या काळाची गरज म्हणून मुलांच्या हाती सोपविलेला मोबाईल त्यांच्या हातातून काढून घेण्याची वेळ पालकांवर ओढवली आहे. या मुद्द्यावर परस्पर विरोध समाजाच्या अनुभवास येतो. कोरोना काळात मोबाईलचा वापर मोठ्या प्रमाणात केला गेला. कोरोनाची साथ संपुष्टात आल्यावर शाळा सुरू झाल्या. पण मुलांच्या हातातला मोबाईल अजूनही सुटला नाही. किंबहुना त्यांचा त्यावरचा वेळ वाढत गेल्याचे आढळून येते. आता शाळा डिजिटल करण्यावर अधिक भर दिला जात आहेत. मुले आणि मोबाईलची संगत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मारक ठरत आहे. त्यामुळे मुलांची शिकण्याची क्षमता बाधित होते. शिक्षणतज्ज्ञ, सर्जनशील शिक्षक आणि सुजाण पालकांना हा मुद्दा चिंतेचा वाटू लागला आहे. त्यावर ज्यांच्या त्यांच्या पातळीवर उपाय योजले जाताना आढळतात. राज्यातील काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून मोबाईल वापरणार नाही, अशी शपथ दिली जाते. त्यात पालकांना सहभागी करून घेतले जाते. शपथ मोडल्याची पालकांची तक्रार आल्यास प्रार्थनेच्या वेळी त्या विद्यार्थ्याचे नाव जाहीर केले जाते आणि त्याला सुधारणा करण्यास आठ दिवसांचा कालावधी दिला जातो. सुधारणा झाल्यावर त्याच मुलाचे जाहीर कौतुकही केले जाते. असे निर्णय याआधीही अनेकदा घेतले गेले आहेत. ही समस्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्न करत राहावे लागतील. कारण प्रयोग सतत करत राहिले तरच चांगले निष्कर्ष निघू शकतात.

**प्रा. मधुकर चुटे** / ९४२०५६६४०४

## वाचक पत्रे

### धर्म कळला का?

पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या हिंदूंच्या नरसंहाराने संपूर्ण देशाला हादरवले. निर्दोष पर्यटकांवर पाकिस्तानातून आलेल्या राक्षसांनी केलेल्या हल्ल्यात २६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. धर्म विचारून झालेल्या या हत्या भारताच्या आत्म्यावर झालेला प्रहार होता. या हल्ल्यात काही दिवसांपूर्वी विवाह झालेल्या नवविवाहितेला आपले सर्वस्व गमवावे लागले. अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. यानंतर सरकारने सिंधू जल करार रद्द करून अनेक कठोर कूटनीतिक निर्णय घेतले. 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानातील ९ दहशतवादी अड्डे आणि ११ हवाई तळ उद्ध्वस्त करण्याचा निर्णय घेण्याची हिंमत दाखवली. दोन्ही देशांमध्ये चर्चा आता फक्त दहशतवाद आणि व्याप्त काश्मीर या विषयांवरच होईल, असे ठणकावून सांगितले. भारतीय सैन्याने आपल्या पराक्रमाने प्रत्येक वेळी न्युक्लियर युद्धाची धमकी देणारा आतंकीस्तानाला चांगलाच धडा शिकवला. सैन्याच्या अचूक मारक क्षमतेचे संपूर्ण जगाने कौतुक केले. सरकारने न्यू नॉर्मल सेट करत कुठलाही दहशतवादी हल्ला युद्ध मानला जाईल आणि त्याचे चोख प्रत्युत्तर दिले जाईल, ही भूमिका घेतली जी स्वागतार्ह आहे. आमच्या देशात घुसून, आमचा धर्म विचारून, आमच्या भगिनींच्या सौभाग्याला धक्का लावाल तर भारतीय सेना तुम्हाला नेस्तनाबूत करेल, असा इशाराच शत्रूला देण्यात आला. शांत, संयमी असणाऱ्या भारताला शत्रू कमजोर समजत होता. परंतु आम्ही सहिष्णु असलो, तरी श्रीकृष्णाने गीतेत दिलेला उपदेश विसरलेलो नाही. शस्त्रे बाजूला ठेवली असली, तरी ती चालवण्याची ताकद आमच्या हातात आहे. धर्माच्या रक्षणासाठी आणि अधर्माच्या नाशासाठी अशी कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या आकांना 'ऑपरेशन सिंदूर'नंतर प्रभु रामचंद्र आणि श्रीकृष्णाच्या वंशजांचा धर्म निश्चितच कळला असेल.

**पूजा सोमलवार** / ८२०८३४९४५१

### एक झाड माझी जबाबदारी...

एक झाड माझी जबाबदारी ही एक पर्यावरणीय चळवळ असून प्रत्येक व्यक्तीने एक झाड लावून त्याची जबाबदारी घेण्याचा संकल्प केला पाहिजे. याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे हरित क्षेत्र वाढवून पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि प्रदूषण कमी करणे हा एक पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण विचार आहे. आपण प्रत्येकाने एक झाड लावण्याचे आणि त्याचे संगोपन करण्याचे कर्तव्य पाळल्यास पर्यावरण समतोल राखले जाऊ शकते. झाडे हवा शुद्ध करतात, जमिनीची धूप थांबवतात. आपल्या परिसरात झाडे लावणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. लावलेल्या झाडांचे संगोपन करणे, त्यांना पाणी देणे, खत देणे आणि कीटकांपासून संरक्षण करणे, इतरांना झाडे लावण्याची प्रेरणा देणे आणि पर्यावरण संरक्षणाच्या महत्त्वाबद्दल जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. आपल्या घराजवळ, कार्यालयाजवळ किंवा सार्वजनिक ठिकाणी झाडे लावा. आपला मित्रपरिवार आणि सोशल मीडियावर अभियानाचा प्रचार करा. स्थानिक कार्यक्रम आयोजित करून लोकांना झाडे लावण्यासाठी प्रोत्साहित करा. लावलेल्या झाडांची काळजी घ्या. हे अभियान निसर्गाच्या संवर्धनासाठी एक छोटे, पण महत्त्वाचा पाऊल आहे. आपल्या सहभागाने आपण आपल्या भविष्यासाठी एक हरित आणि निरोगी पर्यावरण तयार करू शकतो. आपण प्रामाणिकपणे पाळल्यास, पर्यावरणाचे संरक्षण होऊन भविष्यातील पिढ्यांसाठी एक चांगला वारसा आपण निर्माण करू शकतो .अधिकाधिक झाडे लावणे आणि त्यांच्या संगोपनासाठी लोकांना प्रोत्साहित करणे हा आहे. निसर्गाच्या संवर्धनासाठी आणि पर्यावरणाच्या सुधारणेसाठी महत्त्वाचे आहे. एक झाड माझी जबाबदारी ही संकल्पना व्यक्तिगत पातळीवर सुरू करून सामूहिक बदल घडवून आणण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

**श्रीकांत संभाजी मगर** / ९६८९११७१६९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# गावकऱ्यांची तहान भागवण्यासाठी सरपंच पुढे, पिकावर पाणी सोडुन स्वतःच्या शेतातुन गावांमध्ये केला पाणीपुरवठा

**तभा वृत्तसेवा**
**केज दि. १३ जून**

केज तालुक्यातील सोनिजवळा येथील सरपंचाने स्वताच्या शेतीला पाणी न देता गावासाठी तीन किलोमीटर अंतरावरून गावाची तहान भागवली या बाबत सविस्तर वृत्त असे की केज तालुक्यातील सोनिजवळा येथील सरपंच गोविंद ससाणे यांनी एप्रिल पासून आज पर्यंत स्वताच्या शेतीला पाणी न देता गावासाठी शेतातु पाणी आनले, भर उन्हाळ्यात गावला पाणी नाही बारा गाव पाणी पुरवठा करणारी धनेगाव योजना सतत बंद पडत असल्याने गावातील लोकांचे होत आसलेले हाल पाहावले नाही आणि शेती मध्ये कुठलेही पिक नघेता गावासाठी पाणी उपलब्ध करुन दिले,विहीरीने गाठलेला तळ,आटलेले हातपंप त्यामुळे निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई गावकऱ्यांचे पाण्यासाठी होत आसलेले हाल बघुन सरपंचांनी पुढाकार घेतला आणि आपल्या शेतातील पिक वाळवुन शेतातील पिकांचे नुकसान करुन शेतातील विहिरीचे व बोरचे पाणी गावकऱ्यांना उपलब्ध करुन दिले या मुळे पंचक्रोशीतील नागरिकांनी त्यांच्या कामाचे कौतुक केले आहे.



केज शहरापासून जवळच असलेल्या सोनिजवळा या गावात धनेगाव येथुन पाणी पुरवठा करणारी पाइपलाइन जिर्ण झाली असल्याने शासनाने जवळबंन येथुन जलजिवन मिशन योजना सोनिजवळा गावांसाठी गेल्या दोन वर्षांपासून राबली जात आहे परंतु निगरगट्ट अधिकारी व गेंड्याच्या कातडी पांघरलेला गुत्तेदार यांच्या हलगर्जीपणा मुळे आजुन दोन वर्षे तरी गावाला पाण्यासाठी भटकंती करावी लागेल याचा विचार करून सरपंच गोविंद ससाणे व त्यांच्या कुटुंबियांनी गावासाठी शेतातील पिकांचे नुकसान डोळ्यासमोर दिसत असताना देखील पाइपलाइन च्या माध्यमातून गावांसाठी पोहचले आहे

शेतातील उन्हाळी पिके गुंडाळून ठेवली सरपंच गोविंद ससाणे यांना मानवतेची, माणुसकीची आणि आपुलकिची जाणीव असल्याने विहीर अधिग्रहण न करता किंवा पाण्याचा कोणताही मोबदला आपल्याला नको आशी भुमिका त्यांनी घेतली विहीर सोबतच स्वताचा मोटार पंप पाइप लाइन आणि विज उपलब्ध करून दिली आहे, गावच्या पाण्याचा प्रश्न पाहुण आपण विना मोबदला विहीरीचे पाणी देण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. १) सोनिजवळा येथे गेल्या तीन महिन्यांपासून सरपंच गोविंद ससाणे यांनी स्वताच्या शेतातील विहिरीचे पाणी तीन किलोमीटर अंतरावरून गावाला पोहचले आहे व गावची तहान भागवली आहे गावात चार कोटी तेरा लाख रुपयांचे शासनाचे जलजिवन मिशन योजनेचे काम सुरू आहे परंतु ते आजुन दोन वर्षे तरी गावाला पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल असे वाटत नाही त्यामुळे मी सरपंच आसेल किंवा नसेल माझ्या शेतातील विहिरीचे पाणी गावांसाठी कमी पडु देणार नाही मी कुटलेही शेतात पिक घेणार नाही पण गावाला पाण्यासाठी भटकंती करु देणार नाही , गावात म्हसोबा देवस्थान परीसरात व हनुमान मंदिर परिसरात दोन ठिकाणी पाणी उपलब्ध करून दिले आहे


सरपंच
गोविंद ससाणे सोनिजवळा

# रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी प्रा.रोहिणी पाठक तर सचिवपदी मंजुषा जोशी

## रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची नविन कार्यकारिणी जाहिर

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ जून**

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्षपदी प्रा.रोहिणी पाठक यांची तर सचिवपदी मंजुषा जोशी यांची सन २०२५-२०२६ या नविन वर्षासाठी निवड करण्यात आली आहे.





रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासुन अंबाजोगाई शहर व परिसरात सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबविले. उपेक्षीत व वंचितासाठी रोटरी क्लबचे विविध प्रकल्प सातत्याने कार्यरत असतात. याही वर्षी रोटरी क्लबची सन २०२५-२०२६ या कालावधीसाठी नविन कार्यकारीणी जाहिर करण्यात आली आहे. यात अध्यक्ष-प्रा.रोहिणी पाठक, उपाध्यक्ष-धनराज सोळंकी, सचिव- मंजुषा जोशी, सह सचिव-राधेश्याम लोहिया कोषाध्यक्ष सचिन बेंबडे, क्लब ट्रेनर विश्वनाथ लहाने,कल्याण काळे,डॉ. निशिकांत पाचेगावकर, क्लब डमिन जगदीश जाजू , सार्जंट डॉ अनिल केंद्रे, द रोटरी फाउंडेशन डायरेक्टर डॉ नवनाथ घुगे, तर कार्यकारिणी सदस्य म्हणून सुनंदा मुंदडा, ड. अमित गिरवलकर,ग्रँट प्रोजेक्ट डायरेक्टर आनंद कर्णावट,

पुरुषोत्तम रांदड, संतोष मोहिते, मोइनशेख, स्वप्नील परदेशी, डॉ बाळासाहेब लोमटे, प्रा रमेश सोनवलकर,आनंद जाजू,स्वरूपा कुलकर्णी, बालाजी घाडगे, प्रा शैलजा बरुरे,राजेंद्र घोडके,भीमसेन लोमटे,सुरेश मोदी,प्रवीण चौकडा, अंगद कराड, डॉ सचिन पोतदार,गणेश राऊत, शकील शेख, डॉ अरुणा केंद्रे, डॉ अतुल शिंदे, गोरख मुंडे,बाळासाहेब कदम, गोपाळ पारीख,अमृत महाजन, अजित देशमुख,अनिल लोमटे,रुपेश रामावत, कल्पना बेलोकर, ओमकेश दहिफळे, प्रदीप झरकर, यांची निवड करण्यात आली आहे. रोटरी क्लबच्या माध्यमातून आगामी काळात सामाजिक व लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वंचितांसाठी, दिव्यांगासाठी व महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येणार असल्याची रोटरीच्या अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक व सचिव मंजुषा जोशी यांनी सांगितले. रोटरी क्लबच्या या नुतन पदाधिकार्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# अंबाजोगाई नगर परिषदेच्या ढिसाळ कामकाजाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत नागरिकांच्या प्रश्नावर राजकिशोर मोदींनी मुख्याधिकाऱ्यांना धरले धारेवर

**नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबाबत सविस्तर माहिती देण्यासाठी दिले निवेदन**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ जून**

शहराच्या नागरी समस्यांबाबत प्रशासनाची उदासीनता संपण्याचे नाव घेत नसल्याने अखेर माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी पुढाकार घेत महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर आधारित मागण्यांचे पत्र आज नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना सादर केले. यावेळी मोदी यांनी शहरातील नागरी सोयीसुविधांच्या दुरावस्थेबद्दल मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारत शहरहितासाठी अनेक तत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या.

शहरातील सांस्कृतिक व नागरी वापराच्या जागांच्या पारदर्शकतेबाबत प्रशासकीय भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, आद्यकवी मुकुंदराज सभागृह, लोकनेते विलासराव देशमुख सभागृह, एपीजे अब्दुल कलाम सभागृह, सदर बाजारमधील शादी खाना, मुकुंदराज शाळेसमोरील नगरपालिका संकुले सभागृह तसेच एलआयसी ऑफिस मागील स्विमिंग पूल ओपन स्पेस या ठिकाणी भाडेतत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यवस्थांचा तपशील जाहीर करण्याची स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. विशेषतः २०१६ सालच्या दरपत्रकांपासून ते आजतागायतचे दर, सामान्य जनतेसाठी आयोजीत कार्यक्रमांना आकारण्यात येणारे भाडे, तसेच यासंबंधित सर्व कागदपत्रांची सत्यप्रती तात्काळ जनतेसमोर सादर करण्यात याव्यात, अशी आग्रही भूमिका पत्रात मांडण्यात आली आहे.यासोबतच नगर परिषद सर्व विभागांचे वीजबिल भरते का? भरल्यास त्यावर होणारा एकूण खर्च किती आहे, याची माहितीदेखील मागविण्यात आली आहे.

स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाच्या कारभारातही पारदर्शकतेचा अभाव दिसून येत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. दिवाबत्ती देखभाल, कंत्राटी कामगार, साहित्य खरेदी



व दुरुस्ती, तसेच तुरटी, ब्लिचिंग पावडर यासाठी झालेला खर्च जनतेपुढे मांडावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. नगर परिषदेकडून मालमत्ता कर, पाणीपट्टी, घरपट्टी आणि इतर सेवा करांमधून मागील तीन वर्षांत किती महसूल जमा झाला, त्याचे विश्लेषण जनतेसमोर मांडावे, अशी नागरिकांची भूमिका पत्राद्वारे अधोरेखित करण्यात आली आहे.

शहरात सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामकाजावरही गंभीर प्रश्न उपस्थित करताना सध्या पाणीपुरवठा अभियंता नसल्याने तांत्रिक कामकाज संगणक अभियंता आणि लिपिकांकडून पाहिले जात असल्याने कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याची टीका करण्यात आली. ही कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पूर्ण करावीत किंवा तात्काळ पात्र अभियंत्याची नेमणूक करावी, अशी ठाम मागणी मोदी यांनी पत्रात केली आहे. त्याचबरोबर अंबाजोगाई नगर परिषदेच्या स्वच्छता विभागातील कंत्राटी कामगारांना मागील तीन महिन्यांपासून पगार मिळालेला नाही, ही बाब अत्यंत गंभीर असून, त्यांच्या मानधनासाठी प्रशासनाने त्वरीत निर्णय घ्यावा, अशी ठाम भूमिका या मागण्यांमध्ये समाविष्ट होती.

राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वात सादर करण्यात आलेल्या या मागण्यांमुळे प्रशासनासमोर अनेक अनुत्तरित प्रश्न उभे राहिले असून, मागण्यांची पूर्तता लवकरात लवकर न झाल्यास जनआंदोलन छेडले जाईल असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. हे निवेदन देतांना मनोज लखेरा, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, सुनील वाघाळकर , धम्मा सरवदे, सय्येद रशिद, अशोक गंडले,शाकेर काझी, अंकुश हेडे, सचिन जाधव, जावेद गवळी, सय्येद ताहेर, दत्ता सरवदे, खलील जाफरी,महेबूब गवळी, आकाश कऱ्हाड, अजीम जरगर, यांच्यासह कंत्राटी कामगार मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारच्या अकरा वर्षपूर्ती निमित्त बीड जिल्हा भाजपची कार्यशाळा संपन्न

# मोदीजींच्या कल्याणकारी योजना घराघरापर्यंत पोहोचवणार -शंकर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जून**

देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सरकारची गौरवपूर्ण अकरा वर्ष पूर्ण झाल्याबद्दल बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते . भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री नामदारया पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेस कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव किरण पाटील हे उपस्थित होते तर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष शंकर देशमुख , जिल्हा सरचिटणीस प्रा. देविदास नागरगोजे , डॉ. स्वरूप सिंह हजारी , नवनाथ शिराळे , सलीम जहांगी, अशोक लोढा, श्रीकांत सानप, प्रकाश काका सुरवसे, बबन अण्णा झांबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत बोलताना किरण पाटील यांनी मोदीजींच्या नेतृत्वात भारत महासत्तेकडे वाटचाल करत असून मोदींच्या स्टार्ट अप इंडिया लोकलचे ग्लोबल मेक इन इंडिया या संकल्पनांमुळे देश प्रगतीच्या वाटेवर वाटचाल करत आहे असे उद्गार काढले तर जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक जनकल्याणाच्या योजना आणून देशातील गरीब वर्गाच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले आहेत मोदीजींच्या लोक उपयुक्त योजना भारतीय जनता पार्टीच्या वतीने लोकांच्या घराघरापर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न आपण करणार आहोत असे विचार याप्रसंगी त्यांनी व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकार स्थापनेच्या अकरा वर्षपूर्ती निमित्त देशभरामध्ये भारतीय जनता पार्टी विभिन्न कार्यक्रम आयोजित करत असुन सेवा सुशासन व गरीब कल्याण या संदर्भात केंद्र सरकारने राबवलेल्या विविध योजना या निमित्ताने जनतेपर्यंत पोहोचण्याचा




प्रयत्न केला जात आहे. बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीने देखील या संदर्भात विविध कार्यक्रमाचे आयोजन केलले असुन जिल्ह्यातील सर्व मंडळाच्या ठिकाणी वृक्षारोपण, मोदीजींच्या विविध योजनांवर चर्चा करण्याठी कॉर्नर बैठका सारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले असून जिल्हास्तरावर संकल्प सिद्धी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते तर मोदी सरकारच्या

## पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतीपथावर वाटचाल करत आहे-किरण पाटील

विविध योजनांची माहिती देण्यासाठी लवकरच पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे.

बीड येथील भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा कार्यालयावर संपन्न झालेल्या या कार्यशाळेत प्रा. देविदास नागरगोजे यांनी कार्यशाळेच्या प्रस्ताविक पर सत्रात संकल्प ते सिद्धी-सेवा सुशासन व गरीब कल्याणाची अकरा वर्ष या विषयावर मांडणी केली तर जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी विकसित भारताची संकल्पना या विषयावर आपले विचार मांडले .कार्यशाळेच्या समारोप पर सत्रात किरण पाटील यांनी मोदी सरकारची गौरवपूर्ण उपलब्धी -भारताची महासतेकडील वाटचाल , या विषयावर आपले विचार मांडले. या कार्यशाळेत डॉ.स्वरूप सिंह हजारी, सलीम जहागीर, नवनाथ शिराळे, अशोक लोढा, अजय सवाई, पि टी चव्हाण यांनी विविध विषयावर आपले विचार मांडून कार्यशाळेत सहभाग नोंदवला . कार्यशाळेच्या प्रारंभी भारत मातेची प्रतिमा व पंडित दीनदयाजी उपाध्याय , श्यामाप्रसादजी मुखर्जी , गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले व प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यशाळेस भाजपाचे सर्व जिल्हा पदाधिकारी व मनोज पाटील, अशोक रसाळ , उद्धव रासकर ,सचिन दाभाडे, राजेंद्र पवार , विनायक रत्नपारखी ,अभिजीत सोळुंके, सुखदेव रेडे , संजय गंभीरे, गोकुळ कदम हे मंडळ अध्यक्ष उपस्थित होते . भारतीय जनता पार्टीच्या सर्व आघाड्या व मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन शांतिनाथ डोरले यांनी केलं तर आभार प्रदर्शन केज मंडळाचे तालुका अध्यक्ष भगवान केदार यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी दत्ता महाजन,सुनील मिसाळ, विष्णू महाराज सरवसे, राजू शहाणे, अमोल वडतीले, बन्सी हावळे, केशव बडे यांनी प्रयत्न केले.

# किल्ले धारूर शहरात पाणीपुरवठा योजनेतील नळजोडणीसाठी थकीत रक्कम वसूल न करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१३ जून**

किल्ले धारूर शहरातील पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नळजोडण्या देताना नागरिकांकडून थकीत पाणीपट्टी वसूल केली जाऊ नये, अशी मागणी सुरेश गवळी, अध्यक्ष - नवभूमी सेवाभावी संस्था, धारूर यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय किल्ले धारूर यांना एक निवेदन सादर केले आहे.




निवेदनात नमूद केल्यानुसार, किल्ले धारूर शहरात मागील ३५ ते ४० वर्षांपासून पाणीपुरवठा योजना कार्यरत असूनही अनेक भागात पाणीपुरवठा योजना कार्यान्वित नाही किंवा पाईपलाईनच उपलब्ध नाही. त्यामुळे, पाईपलाईन नसल्याने न.प. ची घरपट्टी, नळपट्टी थकीत पाणीपट्टी वसूल करत असल्याचे दिसून येते.

नवीन पाईपलाईनला नळ कनेक्शन देताना थकीत वसुलीची मोहीम न.प.ने राबवू नये, अशी गवळी यांची मागणी आहे. थकीत भरणाऱ्यांची परिस्थिती नसतानाही अशाप्रकारे वसुली केल्यास अनेकजण पाण्यापासून वंचित राहतील, असे निवेदनात म्हटले आहे.किल्ले धारूर शहरातील नागरिकांना मिळणारे पाणी हे मूलभूत गरज असून, पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवणे योग्य नाही. यामुळे, पाणीपट्टीच्या थकीत रकमेसाठी नळजोडणीस अडथळे निर्माण करणे चुकीचे असल्याचेही गवळी यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.तरी, किल्ले धारूर शहरात पाणीपुरवठा योजनेतून नळ कनेक्शन देताना थकीत पाणीपट्टीची वसुली करू नये, अशी मागणी सुरेश गवळी यांनी केली आहे.

# स्वा रा ती मधील डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे माजलगाव येथील महिलेचा मृत्यू, नातेवाईकांनी केला गंभीर आरोप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ जून**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे माजलगाव येथील रहिवासी आसलेल्या श्रीदेवी सोनवणे या महिलेचा ऑपरेशन थेटर मध्ये मृत्यू झाल्याचा आरोप मयत श्रीदेवीच्या नातेवाईकांनी करत उपजिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घेतली आणि आम्हाला संभाजीनगर येथे प्रेताचे शवविच्छेदन करावयाचे आहे त्यासाठी आमचे प्रेत आमच्या ताब्यात द्या अशी मागणी केली मात्र शहरातील काही सामाजिक कार्यकर्त्याच्या मध्यस्थीने शवविच्छेदन स्वा रा ती मध्येच करण्यात येऊन प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. याविषयी प्राप्त माहिती अशी की श्रीदेवी कल्याण सोनवणे रा. माजलगाव ह्यांचीगळ्याची सर्जरी करण्यासाठी स्वा.रा.ती. ग्रा.वै. महाविद्यालय अंबाजोगाई येथे ०८.०६.२०२५ रोजी उपचारार्थ भरती केले होते. यावेळी त्यांच्यावर ऑपरेशन करण्याची तारीख ११.०६.२०२५ रोजी असल्याने त्यांना ऑपरेशन थेटर मध्ये नेण्यात आले. मात्र आत मध्ये ऑपरेशन होण्या आधीच त्यांचा मृत्यू झाला.

त्या नंतर त्या ठिकानचे जुनियर व सिनियर डॉक्टर यामध्ये जो वादग्रस्त सवांद झाला त्या वरून डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे त्यांचा मृत्यू झाला असा आरोप मयताचा मुलगा श्रीकांत कल्याण सोनवणे यांनी केला व त्याने व उपस्थित नातेवाईकांनी स्वा.रा.ती.ग्रा.वै. महाविद्यालय अंबाजोगाई येथे मयताचे शवविच्छेदन करावयाचे नाही असा पवित्रा घेऊन आम्हाला मयताचे शवविच्छेदन छत्रपती संभाजीनगर येथे करावयाचे आहे असा आग्रह धरून त्यांनी येथील उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन मयत श्रीदेवी कल्याण सोनवणे वय ३९ वर्षे रा. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड यांचे शवविच्छेदन स्वा.रा.ती.मा.वै. महाविद्यालय अंबाजोगाई येथे न करता छत्रपती संभाजीनगर येथे करावयाचे असल्याने आमचे प्रेत आमच्या ताब्यात मिळावे व अंबाजोगाई येथील हॉस्पीटलचे उउढ़त फुटेज तात्काळ मिळावे अशी मागणी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली होती मात्र आंबाजोगाई शहरातील काही सामाजिक कार्यकर्त्यांनी दखल घेत व मयत महिलेच्या नातेवाईकांची समज काढून अखेर स्वामी रामानंद तीर्थ काढून अखेर स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालया मध्येच शवविच्छेदन करण्यास संमती दिली व त्यानंतरच शवाविच्छेदन करून या महिलेचे प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

या संदर्भात डॉक्टरांची बाजु माहीत करून घेण्यासाठी आमच्या प्रतिनिधीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर शंकर धपाटे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

### टी.सी. हरवला आहे

नामे मनीषा नारायण जगताप १२ वी (कला) )नापास चा टी.सी. माजलगाव तालुक्यातील सावरगाव बस स्थानक येथून हरवला आहे. कृपया सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
९३५६६२००२८

### टी सी हरवला आहे

राणी श्रीकृष्ण होंडे नावाचा ११ वी (विज्ञान )पासचा टी.सी पाथरी येथून माजलगावकडे जाताना पाथरी बसस्थानक मधून हरवला आहे. कृपया सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क
९३२२१४४६१५

# गौरक्षा प्रमुखावरील गुन्हा रद्द करण्याचे खंडपीठाचे आदेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ जून -**

कुर्बानीसाठी गोवंश घेऊन जाणाऱ्या गाडीला अडवुन गाडी चालकाला मारहाण करून तसेच पोलिसांना कळवुन गुन्हा दाखल करणाऱ्या गोरक्षकावरील गुन्हा रद्द करण्याचे खंडपीठाने आदेश दिले.

याचिकाकर्ते नांदेड विभाग गौरक्षा प्रमुख किरण बिच्चेवार हे राष्ट्रीय महामार्गावरून जात असताना त्यांना गोवंश घेऊन जाणारी अप्पे ऑटो रिक्षा दिसल्यानंतर त्यांनी सदर गाडीला अडवुन गोवंश कशासाठी चालले आहेत अशी विचारपुस करून रिक्षा चालकाला स्वीकार करून मारहाण करून पोलिसांना बोलुन गुन्हा दाखल केला होता. म्हणुन गाडी चालकाने याचिका कत्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्हा रद्द करण्यासाठी याचिकाकर्त्यांनी ॲड. श्रीमंत मुंडे व ॲड. अमोल चाटे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदर याचीका मंजुर करून, न्यायालयाने गौरक्षकावरील गुन्हा रद्द केला आहे.

राष्ट्रीय महामार्गावर गाडी आडुन विचारपूस करणे व पोलिसांना बोलुन गुन्हा दाखल करणे हे कृत्य बेकायदेशीर नाही म्हणुन याचिका कर्त्यावरील गुन्हा चुकीचा आहे. असे जाहीर करून न्यायालयाने गौरक्षकावरील गुन्हा रद्द केला आहे. अशाच प्रकारचे अनेक गुन्हे संपुर्ण महाराष्ट्रभर गोरक्षकावर पोलिसांनी चुकीने दाखल केलेले आहेत. यापुढे या निर्णयामुळे पोलिसांना गोरक्षका विरुद्ध गुन्हा दाखल करता येणार नाही.

### न्याय मिळाला याचा मनस्वी आनंद: बिच्चेवार

आजपर्यंत संविधानाने दिलेल्या मुलभुत कर्तव्याचा भाग म्हणून कायद्याच्या चौकटीत राहुन गोरक्षणाचे काम करत आलेलो आहोत. पण काही हप्तेखोर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना आम्ही अडचण ठरत असल्याकारणाने पोलिसांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून गोरक्षकांवर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल केले आहेत. आमचा न्यायपालिकेवर पुर्ण विश्वास होता आणि आज आम्हाला न्याय मिळाला याचा मनस्वी आनंद वाटत असल्याचे नांदेड विभाग गौरक्षा प्रमुख किरण बिच्चेवार म्हणाले.

# नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावर शिवसेनेचे चक्का जाम आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ जून -**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्या व केळीला हेक्टरी तीन लाखांची मदत देण्यात यावी मागणीसाठी शिव सेना ठाकरे गटाने नांदेड नागपूर रस्त्यावर चक्क जाम आंदोलन करत महायुतीच्या शासनाला विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची आठवण करून दिली.शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. हे रास्ता रोको आंदोलन पिंपळगाव महादेव पाटी परिसरात करण्यात आले.या आंदोलनात नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक, शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.सरकार विरोधी घोषणांनी परिसर दणाणून गेला.

मराठवाड्यात शिवसेना ठाकरे गटाने महायुतीच्या सरकार विरोधात एल्गार पुकारला असुन क्या हुवा तेरा वादा' म्हणत महायुतीच्या जाहिरनाम्यात दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यात येत आहे.नांदेड जिल्हा शिवसेनेचा वतीने नांदेड नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील



पिंपळगाव महादेव पाटी परिसरात चक्क जाम आंदोलन करुन आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.या आंदोलनामुळे या रस्त्यावरील वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती.

केळी उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी तीन लाखांची मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, जिल्हाप्रमुख ,भुजंग पाटील डक, जिल्हाप्रमुख ज्योतिबा दादा खराटे

डॉ.राम चव्हाण, उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे उपजिल्हाप्रमुख , वेंकोबा येडे, उपजिल्हाप्रमुख माणिक लोमटे, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील उपजिल्हाप्रमुख डॉ बालाजी पेनुरकर जिल्हा प्रवक्ता, प्रकाश मारावर, अर्जुनसिंह ठाकूर शहरप्रमुख नांदेड द ,आनंद जाधव प्र.शहर प्रमुख नांदेड , सल्लाउद्दीन काझी( शहर प्रमुख अर्धापूर ), माजी सभापती नरहरी वाघ, सभापती सुनिल पा. कदम (.तालुकाप्रमुख नांदेड उत्तर(,पिंटू पाटील वासरीकर, (तालुकाप्रमुख मुदखेड, )संतोष कल्याणकर (अर्धापूर तालुकाप्रमुख,) पद्माकर सावंत (तालुकाप्रमुख दक्षिण), उमेश पाटील ( तालुकाप्रमुख मुखेड, /शंकर चिंतामवाड( मुखेड शहरप्रमुख,) बालाजी खतमापुरकर तालुकाप्रमुख देगलूर, रामचंद्र रेड्डी (तालुकाप्रमुख धर्माबाद),विजय कल्याणकर,नंदू पाटील वैद्य, पिंटू सुनपे, नवनाथ जोगदंड, किशोर ठाकूर, माधव पांचाळ, लालचंद यादव,मनोज यादव, अशोक डांगे, रमेश क्षीरसागर, सदाशिव इंगळे, संभाजी देशमुख, सिमरन कालरा, बंडू देशमुख, नागनाथ महादपुरे, किरण देशमुख, करण इटगायळ, नितीन सरोदे, विश्वभर पवार,विश्वंभर पवार, माधव पावडे, अविनाश झमकडे, साहेबराव चव्हाण, गिरी महाराज, प्रकाश पाटील येडे, बाबुराव पाटील कांजाळकर, सचिन पाटील,मारोती कदम, रामदास भोजने, सुरेश पावडे, सोपान बोकारे, ईश्वर भाया जाधव, शेख नदीम, अमोल लोखंडे, वैभव गायकवाड, सोनू दमकुंडवार, आदित्य पाटील, शंतनू पाटील सावंत, गणेश शहाणे, प्रकाश संपत्ती, सुमेध कांबळे, सुनील कांबळे यांच्यासह शेकडो शिवसैनिक व शेतकरी सहभागी झाले

## संक्षिप्त वृत्त

### तामसा येथे आयुर्वेदिक दवाखान्याद्वारे वटपौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण

**तामसा** -तामसा येथील शासकीय आयुर्वेदिक दवाखान्याकडून वटपौर्णिमेनिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास बोंदरवाड यांचे मार्गदर्शनाखाली शहरातील गुरु दिगंबर स्वामी प्राथमिक शाळेत महिलांच्या हस्ते वडासह अन्य रोपट्यांचे वृक्षरोपण झाले. यावेळी डॉ. बोंदरवाड म्हणाले,वटवृक्ष हे जगण्यासाठी आवश्यक असणारे ऑक्सिजन मनुष्याला जीवनभर देते. वटवृक्षाचा सहवास जन्मोजन्मी लाभणे आवश्यक आहे. वटवृक्षासह अन्य झाडांचे वृक्षारोपण करून त्यांची निगा व संवर्धन होण्यात महिलांची भूमिका महत्त्वाची असते. महिलांचे निसर्ग व वृक्षप्रेम हे पवित्र व मनोभावे असते.वटपौर्णिमेच्या दिवशी महिलांच्या हस्ते वृक्षारोपण होण्याचे समाधान मोठे आहे. या उपक्रमाबद्दल प्रशालेतील वटवृक्षाच्या पूजनासाठी आलेल्या महिलांनी स्वागत करून आनंद व्यक्त केला. आयुर्वेद आणि वृक्ष यांचा संबंध प्राचीन काळापासून मानवी आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. आयुर्वेदिक दवाखान्याकडून वटपौर्णिमेच्या पवित्रदिनी वृक्षारोपण करण्याचा उपक्रम कौतुकास्पद आणि स्तुत्य असल्याची प्रतिक्रिया अनेक महिलांनी बोलून दाखविली.यावेळी बाजार समितीचे माजी सभापती विशाल परभणकर,शिक्षक दिनेश तवर, आरोग्य कर्मचारी ऋषिकेश गंगातीर, शालेय कर्मचारी नंदू बोंबले यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रशालेचे मुख्याध्यापक गजानन सोनारकर यांनी वटपौर्णिमादिनी वृक्षारोपण केलेल्या रोपट्यांची काळजी प्रशाला आत्मीयतेने करणार असल्याचे स्पष्ट केले.



### डोंगरगाव येथील शेतकऱ्याचे सोलर पंपसेटचे नुकसान

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील मौजे डोंगरगाव शिवारात मृग नक्षत्रात पहिला मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्याच्या तडाख्याने अनेक शेतकऱ्यांच्या केळीसह इतर पिकांचे मोठे नुकसान झाले तसेच अनेक शेतकऱ्यांनी बसवलेल्या सोलार पंपसेट पॅनल कोलमडून पडल्यामुळे मोठे नुकसान झालेले आहे. दि. ९ जून रोजी मृग नक्षत्रात झालेल्या पहिला मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मौजे डोंगरगाव येथील शेतकरी लक्ष्मणराव धोंडजी कस्तुरे यांच्या गट क्र.११४ मधील शेत जमिनीवर सोलार पंपसेट बसविला होता.सदरील सोलार पंपसेट सिस्टीम चे पॅनल वर क्रॅक भेगा पडल्या असून सोलार पंपसेट निकामी झाले आहे,सदरील सोलार पंपसेट हा शक्ती कंपनीकडून खरेदी करण्यात आलेला होता.काही सोलार पॅनल ला क्रॅक भेगा पडल्यामुळे संपूर्ण सोलार पंपसेट निकामी झाला असून पाच एचपीची विद्युत मोटारही बंद झाली आहे. अनिश्चित वादळी वाऱ्यांमुळे बळीराजा मेटाकुटीला आलेला असल्यामुळे सोलार पंपसेट पुरवठा करणारी संबंधित शक्ती कंपनीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची सोलार पंपसेटची संपूर्ण पाहणी करून पुन्हा सोलार पॅनल पंपसेट उभा करून द्यावा अशी मागणी शेतकरी लक्ष्मणराव कस्तुरे यांनी केली आहे.



### चिमुकल्या अवनी चाडकरने वटवृक्षाचे रोपण करून वाढदिवस केला साजरा

**नायगाव** -आताचे चिमुकले हात उद्याचे राष्ट्र बळकट करणारे हात आहेत फक्त या हाताला समाजसेवेचा वसा लाभला पाहिजे तरच ही पिढी पर्यावरण प्रेमी,वृक्षप्रेमी आणि समाज उपयोगी कार्यासाठी झोपून देणारी एक वैचारिक पिढी निर्माण होऊ शकते. नायगाव तालुक्यातील अहिल्यानगर चारवाडी येथील सध्या माणिक नगर नायगाव येथे वास्तव्यास असणारी कु.अवनी अहिलेश्वरी बालाजीराव चाडकर हिचा जन्मदिवस योगायोगाने दिनांक १० जून वटपौर्णिमेच्या दिवशी सुयोग आयोने आला. आणि विशेष म्हणजे आपल्या वडिलांचा वाढदिवस आणि तिचा वाढदिवस एकाच दिवशी हा दुग्ध शर्करायुक्त योग जुळून आला. ती आपल्या चिमुकल्या मित्र-मैत्रिणींना घेऊन या वटपौर्णिमेच्या दिवशी वटवृक्ष रोपण करून तिने समाजापुढे एक नवा आदर्श निर्माण केला आहे.चिमुकलीच्या या राष्ट्रहिताच्या व समाज सेवेच्या कार्याचे एवढ्या लहान वयात असणारी समज आणि समाजाविषयी जागरूकता लक्षात घेता ती पुढील जीवनामध्ये यशस्वी समाज सेवक होऊ शकते यात शंकाच नाहीं.अवनी ही नायगांव तालुक्यातील ग्रामीण साहित्यिक बालाजी पेटेकर खतगांवकर यांची नात असून तिला वृक्षारोपणासाठी सहशिक्षक मंडलापुरे बालाजी सर यांनी प्रेरणा दिली.वाढदिवसाच्या निमित्याने तिने सामाजिक भावनेने केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



## आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ जून -**

प्रधानमंत्री धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियानात नांदेड जिल्ह्यातील माहूर व किनवट तालुक्यातील गावांमध्ये १५ ते ३० जून २०२५ या कालावधीत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आदिवासी समाजाच्या लाभार्थ्यांना विविध आवश्यक प्रमाणपत्रे, कागदपत्रे यांचे वितरण करण्यात येणार आहे. तरी लाभार्थ्यांनी या शिबिराचा आवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला यांनी केले आहे.

आदिवासी जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे आदिवासी जमातींच्या सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेत नांदेड जिल्ह्याचा समावेश असून नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील १२८ गावे तर माहूर तालुक्यातील ४ गावांचा समावेश आहे.

दिनांक १५ ते ३० जून २०२५ या कालावधीत किनवट तालुक्यातील ५५ गावांमध्ये अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना आधार कार्ड, मतदान, राशन, आयुष्यमान भारत कार्ड, जातीचे प्रमाणपत्र, पीएम किसान, जनधन खाते, सिकलसेल आजाराची तपासणी इत्यादी आवश्यक कागदपत्रे या शिबिराच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत.

लाभार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला यांनी केले आहे.

# भोकर तहसीलवर उबाठा पक्षाचा बैलगाडी मोर्चा

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.१३ जून -**

राज्यातील महायुती सरकारने निवडणुकीत महाराष्ट्रातील शेतकरी,महिला व बेरोजगारांना अनेक आश्वासने दिली अन सत्तेवर येताच ती आश्वासने पाळली जात नसल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने भोकर येथील तहसीलवर बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला.शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांच्या संकल्पनेतून महायुती सरकारला निवडणुक काळात दिलेल्या आश्वासनाकडे लक्ष वेधण्यासाठी दि. ११ जुन रोजी ' क्या हुवा तेरा वादा म्हणत ' भोकर येथील तहसीलवर बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला.तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महायुतीच्या पक्षांनी निवडणुक काळात शेतकऱ्यांना कर्ज माफी, लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपय,शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत पंधरा हजार देणे,एक रुपयात पिक विमा,४५ हजार गावांमध्ये पानंद रस्ते मुक्त करणे, शेतकरी यांनी केलेल्या खतांच्या खरेदीवर जिएसटी मुक्त करु, वृद्ध धारकांना २१०० रुपय पेन्शन करणे, निराधार व दिव्यांगाना अनुदानात वाढ करणे, शेतकऱ्यांना चोवीस तास विज पुरवठा करणे,हर घर जल,हर घर जल योजना राबविणे, मराठवाडा वॉटर ग्रिड केंद्रातुन मंजुर करुण घेणे असे अनेक आश्वासने निवडणूक काळात महायुतीच्या नेत्याकडुन देण्यात आले.या मोर्चात शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा उ.संघटक सुभाष नाईक किनीकर, तालुका प्रमुख संतोष आलेवाड,शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार, माजी उप जिल्हा प्रमुख सतीश देशमुख,शहर संघटक राहुल कोंडलवार, माजी उप-तालुकाप्रमुख माजी मारोती पवार,पं,स. सदस्य रामा भालेराव,माजी सरपंच रमेश महागावकर,उप ता.प्रमुख विशाल बुध्देवाड, पांडुरंग कटकमवाड, आदी शिवसैनिक सहभागी झाले होते.यावेळी तहसीलदार विनोद गुंडमवार यांना निवेदन देण्यात आले.

# नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करून नुकसानभरपाई देण्यात यावी : हेमंत पाटील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ जून -**

मागील काही दिवसांपासून राज्यात मुख्यतः मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वादळी वारे व अतिवृष्टीमुळे केळी सह फळबाग व शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.या नुकसानग्रस्त शेतीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी शिवसेना मुख्यानेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नामदार हेमंत पाटील यांनी केली. यावेळी त्यांच्यासमवेत हदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर,आणि नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव बोंढारकर यांची उपस्थिती होती.

नांदेड , हिंगोली जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात वादळी वाऱ्यासह मोठया प्रमाणात पाऊस होत आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे,पशूंचे नुकसान झाले आहे .यामध्ये



प्रामुख्याने केळी बागा जमीनदोस्त झाल्याने केळीच्या दरात घसरण झाली असून ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे.तसेच नदी नाल्यांना पूर येऊन शेतकऱ्यांच्या पशुधनाची हानी झाली आहे. त्यामुळे अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल झाला असून नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी नामदार हेमंत पाटील यांच्यासह आमदार कोहळीकर व आमदार बोंढारकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री यांनी तात्काळ संबंधित विभागाला तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले

# नारायण मुंडे यांची गगन भरारी नारायणा इन्स्टिट्यूट निर्माण करतेय शिक्षणाचा 'लोहा पॅटर्न'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१३ जून -**

आरोग्य, दळणवळण, याबरोबरच आता दर्जेदार शिक्षण काळाची गरज बनले आहे. यासाठी पालक स्वत: कष्ट करून आपल्या पाल्यांना मोठ्या शहरात शिक्षणासाठी पाठवत असल्याचे दिसून येते, मात्र यासाठी पालकांना खुप खर्च करावा लागतो , ही बाब लक्षात घेऊन प्रा. नारायणराव मुंडे यांनी लोहा शहरात 'केजी ते पीजी ' शिक्षणाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून मातृभुमीचे ऋण फेडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अल्पावधीतच नारायणा इन्स्टिट्यूट ने शिक्षणाचा लोहा पॅटर्न निर्माण केला आहे.

शैक्षणिक क्षेत्रात ३५ वर्षापासून शिक्षणात क्रांती केलेले शिक्षणतज्ज्ञ प्रा. नारायण मुंडे यांचे फार मोठे योगदान आहे. आता तीच शिक्षण क्रांती तालुक्याच्या ठिकाणी राबविल्या जात आहे. पूर्वी दर्जेदार उच्च शिक्षण घेण्यासाठी पुणे मुंबई दिल्ली, गुजरात मधील 'कोटा' सारख्या ठिकाणी जावे लागायचे, मात्र आता लोहा सारख्या तालुकास्तरावर नारायणा शाळेत दर्जेदार शिक्षण मिळत आहे त्या ठिकाणच्या सर्व सुविधा तालुकास्तरावर विद्यार्थ्यांना मिळत आहेत.फाउंडेशन वर्गाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची स्पर्धात्मक परिक्षांची तयारी करून घेतली जाते. प्रा नारायण मुंडे स्वतः शाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना होतो आहे.

लातूर, नांदेड, परभणी' हे तीन जिल्हे आणि 'पालम, लोहा, कंधार आणि अहमदपूर' हे चार तालुके एकत्र आणून विद्यार्थ्यांत 'टॅलेंट' तयार करण्याचे एक मोठे आव्हान आहे. या भागातील गोरगरीब, सर्वसामान्य शेतकरी, शेतमजूर कुटुंबातील पालकांना परवडणार्या दरात दर्जेदार शिक्षण देण्याचा त्यांचा संकल्प त्यांनी सत्यात उतरवला आहे.



**कला - क्रीडा शिक्षणाबद्दल पालकांची नकारात्मकता नाहीशी**

येथे क्रिडा शिक्षण मग ते वैयक्तिक असो की सांघिक त्यात विद्यार्थी निपून झाला पाहिजे. शारीरिक शिक्षणाबरोबर मानसिक शिक्षण त्यास पूरक ठरवू पाहते, ही फार मोठी जमेची बाजू आहे. पहिल्या टप्प्यात नारायणा इंटरनॅशनल स्कूल च्या माध्यमातून सीबीएसई शिक्षण देणारी शाळा सुरु केली आहे. तसेच रामटेक विद्यापीठाचे नांदेड जिल्ह्यात एकमेव प्रशासकीय सेवा महाविद्यालय सुरु झाले आहे. आगामी काळात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

केजी ते पीजी शिक्षणासाठी आता मुंबई पुणे नांदेड या शहरात जाण्याची आवश्यकता येथील विद्यार्थ्यांना पडणार नाही . प्रा. नारायणराव मुंडे यांच्या दूरदृष्टी आणि अथक परिश्रमामुळे येथील विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. नांदेड, पुणे येथे मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा तसेच मार्गदर्शन नारायणा इन्स्टिट्यूट लोहा येथे निश्चित मिळत आहे.

**शिक्षण क्षेत्रात एक लोहा पॅटर्न निर्माण होतो आहे.**

अध्ययवत शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या गळी उतरावे म्हणून देशात, राज्यात अनेक चर्चा होत आहेत.नारायणाने आधुनिक तंत्रज्ञान, अध्ययवत क्रीडांगण, उपकरणं, बौद्धिक कसोट्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला आहे , वैयक्तिक आनंददायी शिक्षण दिलं आहे व विद्यार्थ्यांच्या वर्तनात आणि बुद्धी विकासात बदल घडवून आणून शिक्षण क्षेत्रात लोहा पॅटर्न निर्माण केला आहे.

**गुणवत्तेची परंपरा**

नारायणा इंटरनॅशनल स्कुल मध्ये शिक्षणा बरोबरच ईतरही ॲक्टिव्हिटींना चालना दिली जाते, येथील खेळाडू जिल्हा, राज्य स्तरावर पोहचले आहेत, विविध परीक्षा श्रेया, होमी भाभा खचे, NSO, IEO, jr. Scientisc तसेच १० वी, व १२ वी बोर्ड परिक्षा मध्ये शाळेने गुणवंत विध्यार्थी घडवले आहेत.

## चांडोळ्यात बाळू मामांच्या पालखीचा उत्सवी समारोप

**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि.१२ जून -**

मुखेड तालुक्यातील ग्राम चांडोळा नगरीत श्री.संत सद्गुरू बाळू मामांची पालखी व मेंढरांचा तळ मुक्कामी येऊन,अखेर बुधवार दि.११ रोजी दुपारी चांडोळा नगरीत वाजतगाजत भव्य बाळू मामा पालखी उत्सव सोहळा भाविक भक्तांकडून गाव प्रदक्षिणा घालत समारोपीय चांगभलंच्याऽऽऽ जयघोषात साजरा करण्यात आला.

येथील सद्गुरू बाळूमामांची ही १२ व्या क्रमांकाची पालखी असून,महाराष्ट्रात बाळूमामांच्या मेंढरांचे तब्बल १९ तळ ग्रामीण भागात विखुरले आहेत.सकाळ, संध्याकाळ आरती,महाप्रसाद,भात, वरण, खीर,कन्या व बाळूमामांनी आयुष्यात व्यतीत केलेल्या चमत्कारिक बाबींचे रसाळ विवेचनही ऐकायला मिळाले.तळात अनेक महाराष्ट्रातील सेवेकरी भक्तांचाही विशेष सहभाग राहिला आहे

या सदरील बग्गीचे कारभारी यशवंत भाऊ सुरनर बनवसकर हे आहेत.श्री.क्षेत्र आदमापूर, ता.भुदरगड; जि.कोल्हापूर येथून आलेल्या बाळूमामा उत्सव यात्रेत चांडोळा गावपरिसरातील भाविक भक्तगणांची दर्शनार्थ उल्लेखनीय दररोज उपस्थिती होती.काल या पालखीचा समारोप होऊन तळाचे इतर गावी प्रस्थान झाले आहे.

# वारंवार आययूआय फेल्युअर्स होत आहे? पुढे काय प्रयत्न करायचे हे जाणून घ्या

**तभा वृतसेवा**
**नागपूर, दि.१३ जून -**

आई होण्याचे सुख हे सर्वात आनंददायी असते. पण ३१ वर्षांची प्रिया आठ वर्षांपासून गर्भधारणेचा प्रयत्न करत होती आणि मेडिकल हिस्ट्रीनुसार तिला लॅपरोस्कोपिक ओव्हेरियन ड्रिलिंग, मायोमेक्टोमी, सहा ओव्हुलेशन इंडक्शन सायकल आणि तीन अयशस्वी आययूआय यांचा सामना करावा लागला होता. अनेक अपचार आणि प्रक्रियांनंतर तिला शारीरिक त्रास होण्यासोबत ती मनातून निरसन न झालेल्या समस्यांमुळे खचून गेली होती. हे डॉ. प्रियंका शाहणे, फर्टिलिटी स्पेशलिस्ट, बिर्ला फर्टिलिटी ॲण्ड आयव्हीएफ, नागपूर यांनी शेअर केले आहे.

Birla Fertility & IVF

तिला गाथेमधून मोठी वास्तविकता समोर येते: प्रजनन उपचार घेत असलेले अनेक जोडपे अयशस्वी ठरल्यानंतर देखील वारंवार आययूआय सायकल चालू राहतात. कारण ते सोयीस्कर वाटते, ज्यामधून त्यांना किमान आशा मिळते. पण या चक्राचे प्रमाण किती असले पाहिजे? वैद्यकीयदृष्ट्या तीन अयशस्वी आययूआय प्रयत्नांनंतर संपूर्ण पूनर्मूल्यांकनाची आवश्यकता असते. यानंतर देखील प्रयत्न सुरू ठेवल्यास अधिक गुणकारी उपचार पर्यायांना विलंब होऊ शकतो.

काय चुकीचे होत असेल?, पुढील उपचार काय?, वारंवार आययूआय अपेक्षित परिणाम देत नसतील तर सखोल मूल्यांकन अत्यंत महत्त्वाचे आहे.

गर्भाशयाच्या लिनिंगचे मूल्यांकन करण्यासाठी आणि एंडोमेट्रिटिस किंवा क्षयरोगाची शक्यता दूर करण्यासाठी ट्रान्सव्हॅजिनल सोनोग्राफी आणि डायग्नोस्टिक हिस्टेरोस्कोपी गर्भाशयाच्या राखीव जागेची तपासणी करण्यासाठी एएमएच चाचणी डब्ल्यूएचओच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वीर्य विश्लेषण शुक्राणूंच्या गुणवत्तेसाठी डीएनए फ्रॅगमेंटेशन इंडेक्स (डीएफआय) तपासले पाहिजे. अनुवांशिक विसंगतींसाठी जोडप्याचे कॅरिओटाइपिंग समस्या आढळल्या - जसे अंडीची खराब गुणवत्ता किंवा जास्त डीएनए फ्रॅगमेंटेशन - तर जोडप्यासाठी वैयक्तिकृत प्रोटोकॉल आणि प्रगत शुक्राणू निवड तंत्रे (जसे की मायक्रोफ्लुइडिक्स किंवा स्पर्म सॉर्टर) वापरून आयव्हीएफ मार्ग स्वीकारणे अधिक फायदेशीर ठरू शकते. भावनिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या, काय साह्यभूत ठरते?

नियमित प्रक्रियांऐवजी पुराव्यावर आधारित, धोरणात्मक काळजी घेण्याला प्राधान्य द्या. पारदर्शकता असलेले, व्यापक चाचणी देणारे आणि वैयक्तिक योजना विकसित करणारे क्लिनिक्स शोधा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानसिक आरोग्य उत्तम राखण्याला प्राधान्य द्या, कारण आशेचा किरण त्रासदायक नाही तर सक्षम करणारा असला पाहिजे.

प्रियाच्या केससंदर्भात त्यांनी आयव्हीएफ निवडला आणि हिस्टेरोस्कोपिक मायोमेक्टोमी व किमान उत्तेजना यांचा समावेश असलेल्या योग्य पूर्व-उपचार मिळाले, ज्यानंतर त्यांना पहिल्याच चक्रात गोड बातमी मिळाली.

# विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ! बदनापूरमध्ये रस्ता ओलांडणे बनले धोक्याचे

## » शाळांसमोर ना गतिरोधक, ना झेब्रा क्रॉसिंग; पालक भयभीत; आमदार नारायण कुचे यांनी याकडे लक्ष घालण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर/प्रतिनिधी**

बदनापूर शहरातील शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रोज शाळेत जाताना आणि घरी परतताना जीव मुठीत धरावा लागत आहे. शहरातील अनेक शाळांच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर ना झेब्रा क्रॉसिंग आहे, ना गतिरोधक – त्यामुळे चिमुकल्या विद्यार्थ्यांचे रस्ते ओलांडणे अत्यंत धोकादायक बनले आहे.या धोकादायक परिस्थितीमुळे पालकांचे काळजाचे ठोके वाढले आहेत. आपल्या मुलांचे संरक्षण करण्यासाठी अनेक पालकांना शाळेबाहेर रस्त्यावर उभं राहावं लागतं. तरीही भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे अपघाताची भीती कायम मनात घर करून असते.सामाजिक कार्यकर्त्यांचा पुढाकार सामाजिक कार्यकर्ते सय्यद साजिद, यांनी याप्रकरणी आवाज उठवला आहे. त्यांनी आमदार नारायण कुचे यांना निवेदनाद्वारे सदर समस्येकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे. शहरातील प्रत्येक शाळेसमोर झेब्रा क्रॉसिंग, योग्य फलक आणि गतिरोधकाची त्वरित गरज आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण होईल, असे सय्यद यांनी स्पष्ट केले आहे.

**शाळेसमोर फलकही नाहीत!**





शहरातील अनेक शाळांच्या ठिकाणी 'पुढे शाळा आहे' असे सूचना फलकही लावलेले नाहीत. या हलगर्जीपणामुळे वाहनचालकांना अंदाजही येत नाही की इथे मुले रस्ता ओलांडत असतील. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.वाहतुकीचा विस्कळीत कारभार.

शाळा सुटण्याच्या वेळी मुख्य रस्त्यांवर विद्यार्थ्यांचा प्रचंड वावर असतो. याचवेळी पालक, रिक्षा, स्कूल व्हॅन व बसेस शाळेजवळ उभ्या राहत असल्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होते. त्यातच भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका अनेक पटींनी वाढतो.

पाथ्रीकर कॉलेज, मथुरादेवी कॉलेज परिसर तसेच नवीन बसस्थानकाजवळील रस्ते देखील अतिवर्दळीचे आणि उताराचे असल्याने अतिशय धोकादायक बनले आहेत. तरीही नगरपंचायत आणि वाहतूक शाखेने अद्याप कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत.तत्काळ उपाययोजनांची गरज सय्यद साजिद यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे मागणी केली आहे की, शहरातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांसमोर झेब्रा क्रॉसिंग शाळा समोर' फलक गतिरोधक वाहतूक पोलिसांची नेमणूक तात्काळ करावी. शहरातील मुलांच्या सुरक्षेसाठी ही केवळ गरज नाही, तर जबाबदारी आहे – जी प्रशासनाने तातडीने पार पाडलीच पाहिजे.

# संक्षिप्त

## काँग्रेसच्या मशाल मोर्चात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष माजी आ हर्षवर्धन सपकाळ यांच्या सुचणेवरून जालना जिल्हा काँग्रेस कमिटीकडुन दि १४ जुन शनिवार रोजी सांय. ५:३० वा नुतन वसाहतीतील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालय जालना पर्यंत मशाल मोर्चा चे आयोजन जिल्हा प्रभारी माजी आ नामदेवराव पवार, खा डॉ कल्याणराव काळे,आ राजेश राठोड, माजी आ कैलास गोरंट्याल,जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख ओबीसी राष्ट्रीय समन्वयक राजेंद्र राख,महिला जिल्हाध्यक्ष नंदाताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून या मोर्चात जालना जिल्ह–ातील काँग्रेस पक्षाचे आजी माजी जि प सदस्य, पं.स.सदस्य,नगरसेवक व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्य आणि पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ड राम कुराडे,विजय चौधरी,राम सावंत, महावीर डक्का,इब्राहिम भाई, रफिक सर, बदर चाऊस, शेख शमशु, शिवप्रसाद चितळकर, विनोद यादव यांनी केले आहे.

## कत्तलीसाठी जात असलेल्या दोन गायी जप्त; आरोपी गजाआड



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

पोलीस ठाणे गोंदी येथे दिनांक ०९/०६/२०२५ रोजी १२.३८ वाजण्याच्या दरम्यान शहागड ते पैठण रस्त्यावर डोमलगाव फाट्यावर यातील आरोपी १) खलील बशीर कुरेशी वय ३४ वर्षे रा. गेवराई २) बाळू गोरख शेजूळ वय २४ वर्षे रा. खांडवी ता. गेवराई व ३) विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी त्यांच्या ताब्यातील अशोक लिलेंड कंपनीचे वाहण क्रमांक चक-१५-ऋत-१९९८ यामध्ये दोन गोवंशीय गायी या कत्तलीसाठी घेउन जात असल्याची माहीती मिळाल्यावरून सहायक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांच्या सह पोहेकॉ ०८ केंद्रे यांनी सदर गाडी थांबवून त्याच्याकडे परवान्या बाबत विचारपूस करता त्यांच्याकडे परवाना नसल्याचे सांगीतले त्यावरून ते सदरच्या दोन गायी या कत्तलीसाठी घेउन जात असल्या बाबत खात्री झाल्याने वरील तिघांविरूध्द पोलीस स्टेशन गोंदी येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्याकडून एक वाहण व दोन गायी असे एकूण ७,५०,००० रूचा माल जप्त करण्यात आलेला आहे. दोन गायी या देखभाली करीता गौशाळा येथे जमा करण्यात आलेला आहेत व आर–ोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक, श्री अजयकुमार बंसल साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक, आयूष नोपाणी साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, श्री विशाल खांबे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक किरण हावले, पोहेकॉ रामदास केंद्रे, पोकॉ शाकिरोद्दीन सिध्दीकी, सर्व पोलीस ठाणे गोंदी यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक किरण हावले हे करीत आहेत.

## जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव धुळखात पडून असल्याने विद्यार्थी त्रस्त –साजीद सय्यद

**तभा वृत्तसेवा**
**बदनापूर/प्रतिनिधी**

जात पडताळणी समितीकडे विद्यार्थ्यांचे प्रस्ताव धुळखात पडून असून, यामुळेच त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वैधता प्रमाणपत्र त्वरीत देण्यात यावी, अशी मागणी सय्यद साजीद यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात सय्यद साजीद म्हणाले की, विद्यार्थ्यांना वेळेवर जात पडताळणी करुन दिली जात नाही. त्यामुळे त्यांची अनेक कामे खोळंबली आहेत. बदनापुर तालुक्यासह जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रस्ताव कितीक दिवसा पासून समितीकडे प्रलंबित आहेत. सर्व प्रक्रिया ऑनलाईन असतांना हे काम रेंगाळले आहे. रक्त नात्यातील जात वैधता प्रमाणपत्र जोडलेले असतांना वैधता प्रमाणपत्र दिले जात नसून, समितीकडे वारंवार चकरा माराव्या लागत असल्याने विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष द्यावे, अशी । मागणी सय्यद साजीद यांनी

## शेतकऱ्यांचा संयम संपला; मराठा महासंघ रस्त्यावर उतरणार –देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

एकीकडे अमरावती येथे आमदार बच्चू कडू कर्जमाफीसह शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी अन्नत्याग आंदोलन करत आहेत, तर दुसरीकडे जालन्यात समृद्धी महामार्गाच्या जमिनीबाबत अन्यायकारक भरपाईविरोधात दिलीप राठींच्या नेतृत्वात ३०० गावातील शेतकरी सव्वा महिन्याप–ासून आंदोलन करत आहे. तरीदेखील सरकार लक्ष द्यायला तयार नसल्याने, या दोन्ही आंदोलनास मराठा महासंघाने ठाम पाठिंबा दर्शवत, शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर महासंघाची आंदोलनशैली सरकारला परवडणारी ठरणार नाही, असा थेट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आला आहे.

मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्यासह जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, युवक जिल्हाध्यक्ष ड. शैलेश देशमुख, जिल्हा समन्वयक लक्ष्मण उढान, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, विद्यार्थी आघाडीचे इंजी. शुभम टेकाळे, कामगार जिल्हाध्यक्ष मंगेश मोरे आदींनी शुक्रवार दि. १४ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेतकऱ्यांना कर्जमाफी, विधवा–दिव्यांगांना मानधन, शेतमालाला २० टक्के अनुदान, आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदत आदी मागण्यासाठी आमदार बच्चू कडू यांनी अमरावती येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केलेले असून, त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली आहे तर दुसरीकडे, जालना येथे समृद्धी महामार्गासाठी बाजारभावाच्या तुलनेत अत्यल्प भरपाईमुळे ३०० गावांतील शेतकरी उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. या मुद्द्यावर दिलीप राठी यांच्या नेतृत्वाखाली सव्वा महिन्यापासून आंदोलन सुरू आहे. बाधित शेतकऱ्यांनी लेकरा बाळांसह जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मारली, आता रस्ता रोकोचे सत्र सुरू झाले आहे. यापूर्वीच आंदोलकांनी सामूहिक आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे त्यांचा संयम सुटत चालला असून, तरीदेखील सरकार झोपेचे सोंग घेत असल्याने संतापाचा उद्रेक होऊ लागला आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आता या आंदोलनाला मराठा महासंघाने पाठिंबा दर्शविला असून, या मुद्द्यावर आम्ही आंदोलन सुरू करणार आहोत. शासनाला जाग येईपर्यंत आम्ही थांबणार नाही, असा खणखणीत इशारा या शिष्टमंडळाने निवेदनात दिला आहे.

## लॉयन्सच्या सर्वाइकल कॅन्सर जनजागृती कार्यक्रमात सहाशे विद्यार्थिनींचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



लायन्स क्लब जालना आणि सीव्हील क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने २४ जून रोजी ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी मोफत सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक मोफत लसीकरण उपक्रम राबविण्यात येणार असून, त्यात १५०० मुलींना मोफत लसीकरण करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने गुरुवार दिनांक १२ जून रोजी पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जनजागृतीपर कार्यक्रमात सुमारे ६०० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

यावेळी मार्गदर्शक म्हणून स्त्रीरोग तज्ञ डॉ. गंगा दरगड ह्या होत्या. व्यासपीठावर पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य जे. हेन्री डेव्हिड, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गवारे, गर्ल्स वेलफेअर कमिटी इन्चार्ज स्मिता वैष्णव, प्रशासकीय अधिकारी विशाल गुजराथी, लायन्स क्लबच्या अध्यक्षा सौ. जयश्री लड्डा, प्रकल्प समन्वयक अतुल लड्डा यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. दरगड यांनी विद्यार्थिनींना सर्वाइकल कॅन्सर म्हणजे काय, त्याचे कारण – विशेषतः एचपीव्ही (क्लृत) व्हायरस आणि त्यावरील प्रभावी प्रतिबंधक उपाय म्हणजे लसीकरण याविषयी अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. क्लबचे अध्यक्ष जयश्री लड्डा यांनी विद्यार्थिनींना प्रेरणा दिली आणि या उपक्रमाचे सामाजिक आरोग्यदृष्ट्या महत्त्व अधोरेखित केले व आझाद मैदानाजवळ असलेल्या सिव्हिल क्लबमध्ये २४ जून रोजी सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत राबविण्यात येणाऱ्या अभियानात ९ ते १८ वयोगटातील मुलींनी लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन केले. याप्रसंगी विद्यार्थिनींसाठी माहितीपत्रक व संमतीपत्र वितरित करण्यात आले आले. पालकांनी हे समजून घेऊन भरून कार्डच्या छायांकित प्रतिसह पाठवायचे आहे. शालेय प्रशासनाने पालकांसोबत संवाद साधून संपूर्ण माहिती देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## गुणवंत विद्यार्थ्यांने देश हिताकरिता राजकारणात यावे -विनायक चोथे

**आ.आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गुणगौरव सोहळा**

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



गुणवंत विद्यार्थ्यांनी केवळ मेडिकल इंजिनिरींग यासारख्या क्षेत्रात गुणवत्ता सिद्ध न करता राजकीय क्षेत्रात येऊन देशाहिताकरिता योगदान द्यावे असे प्रतिपादन मराठवाडा विभागीय युवासेना सचिव व स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक श्री. विनायक चोथे यांनी अंबड येथील स्वामी समर्थ मंदिर सभागृहात आयोजित अंबड तालुका १० व १२ विच्या गुणवंताच्या गुणगौरव व सत्कार समारंभाच्या प्रसंगी केले. सदरील कार्यक्रमाचे आयोजन मा. आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिवसेना– युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळ शहागड यांच्या सयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. पुढे बोलतांना श्री चोथे म्हणाले कि राजकारणात गुणवंतानी सहभाग घेतला तर देशाची प्रगती उचावेल व राजकीय दिशेला पण एक नवीन वळण मिळेल. मा. ठाकरे यांच्या प्रेरणेतून आम्ही पण राजकरणातून समाजकार्य करण्याकरिता प्रेरित झालो असून आपण आपल्या आईवडीलाच्या कष्टातून प्रेरणा घेऊन त्यांची मान समाजात उंचावेल असे कार्य करावे. वयाच्या १८ ते २८ या काळात आपण सर्व आईवडीलांच्या प्रति असलेली कर्तव्य व जबाबदाऱ्या योग्यरीतीने पार पाडल्या पहिजे. केवळ गुणांच्या टक्केवारी वर यशाचे स्वरूप न ठरवता ज्या क्षेत्रात गेलात त्या क्षेत्रात जबाबदारी व ध्येयाने वाटचाल केली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात अंबड तालुक्यातील १४२ गुणवंताचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक विनायक चोथे, त्याच प्रमाणे उपस्थितीमध्ये भानुदास घुगे, हुनमान धांडे, पंडित गावडे, श्रीमंत खटके, बंडूकाका पागिरे,दिनेश काकडे, कल्याण टकले, कुमार रुपवते, राम लांडे, नंदकिशोर पुंड,सिद्धू जऱ्हाड, गोपाल जवळकर, सुरेश जगताप,विष्णू देवडे, विजय कोठाडे,सतीश धुपे, मुकुंद हुसे, अनिस तांबोळी,सुदाम काळे, गणेश मुळे, बाळासाहेब गावडे, अभिजीत खटके, गणेश गायकवाड, गोकुळ बारवाल, गौतम खरात, लक्ष्मण काकडे, बाळासाहेब तारडे, अमोल टोपे, शाम राठोड, कल्याण टकले, अनिरुद्ध भागवत आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. मारोती घुगे यांनी केले तर प्रास्ताविक इजाज शेख यांनी केले यावेळी कु. शिवाजली घुगे, शिवकन्या बिन्नीवाले व मिसबाह पटेल या विद्यार्थीनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. सुनील सामग यांनी केले तर सदरील कार्यक्रमास जगन दुर्गे, महेश गोडबोले, संतोष वाघ, भगवान मिरकड, एकनाथ मिटकर, एजाज शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, युवासैनिकांनी परिश्रम घेतले.

## गोमातेचे रक्षण करणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी –प.पू.गोवत्स राधाकृष्णजी महाराज

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



मंठा येथे श्री जगदंबा देवीच्या पायथ्याशी असलेल्या माता भगवती गोशाळेचे भूमिपूजन प.पू. गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. यावेळी प.पू. महंत भागवतगिरीजी महाराज आणि प.पू. महंत बालकगिरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपदेश करताना गोवत्स राधाकृष्णजी महाराजांनी गाय ही जगाची जननी आहे, गाईचे रक्षण करा. भगवंताचे सर्वात जास्त प्रेम गोमातेवर आहे, सर्वांनी गोमातेची सेवा केल्याने भगवंताची प्राप्ती होते असा उपदेश दिला. येथील युवकांनी माता भगवती गोशाळेच्या उभारणीचे कार्य हाती घेतले आहे, या युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी आल्याचे गोवत्स राधाकृष्ण महाराजांनी सांगितले. प.पू. महाराजांनी गायलेल्या जय गोमाता जय गोपाल भक्त वत्सल प्रभुदीन दयाल या भजनात भावीक तल्लीन झाले होते. याप्रसंगी प.पू. बालकगिरीजी महाराजांनी आशीर्वादपर उपदेश केला. ते म्हणाले की, गोमातेच्या सेवेतच सुख, शांती आणि समृद्धी आहे. साधुसंत, ब्राह्मण आणि गोमाता सुरक्षित राहिले तर देश सुरक्षित राहील असे सांगून कत्तलखान्यामध्ये जाण्यापासून गाईंना रोखा त्यासाठी सर्व हिंदूंनी एकत्र यावे असा उपदेश केला. माता भगवती गोशाळेच्या अध्यक्ष संतोष तिवारी आणि महेश सराफ यांनी परमपूज्य महाराजांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिराम तिवारी यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी युवा वर्गाने पुढाकार घेतला. या भूमिपूजन सोहळ्याला राम कृष्ण हरी प्रभात फेरी मंडळ तसेच शहरातील व्यापारी, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### » वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण शिबिराचा समारोप; आ.लोणीकर यांच्या वतीने प्रशिक्षणार्थींना वृक्ष भेट

## पर्यावरण संवर्धनाचा मूलमंत्र प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावा; आ.बबनराव लोणीकरांचा शिक्षकांसाठी संदेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



पर्यावरणाची समस्या ही गंभीर होत चालली आहे. आज या समस्येला वैश्विक रूप प्राप्त झाले. पन्नास वर्षांपूर्वी पर्यावरण या विषयावर जगात अशी चर्चा होत नव्हती, परंतु आज प्रमुख विषयांपैकी हा एक महत्त्वाचा विषय बनलेला आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे. पर्वताच्या प्रदेशात भूस्खलन वाढत आहेत. नदीकाठच्या गावांना सातत्याने महापुराचा तडाखा बसत आहे. शहरीकरण व औद्योगिकीकरणात वाढ झाली. शेतकरी रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अति वापर करीत आहे. चक्रीवादळ, भूकंप यासारख्या आपत्तीमध्ये वाढ झाली आहे. एवढेच नव्हे, तर माणसाचे आयुष्य देखील कमी होत चालले आहे. या सर्व व गोष्टीला पर्यावरणाचे बिघडलेले समतोल कारणीभूत आहे. प्रत्येक शिक्षकाने पर्यावरण संवर्धनाचा मूलमंत्र आपल्या विद्यार्थ्यांना द्यावा अशा संदेशासह आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना प्रत्येकी एक वृक्ष भेट म्हणून पाठवला.

पर्यावरण संवर्धनाचा मूलमंत्र जपत वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षणार्थी व सुलभक यांनी आज प्रशिक्षणाचा समारोप केला. समारोप कार्यक्रमानंतर परीक्षा व तदनंतर आमदार बबनराव लोणीकर यांच्या वतीने सर्व प्रशिक्षणार्थींना एक वृक्ष भेट देण्यात आला. आमदार लोणीकरांच्यावतीने प्रा सहदेव मोरे पाटील यांनी सुलभकांच्या हस्ते वृक्षांचे वितरण केले. पर्यावरणाच्यादृष्टीने सर्वात महत्त्वाचा आणि आवश्यक घटक म्हणजे हवा होय. वृक्षाचे कमी होत चाललेले प्रमाण, वाहने व कारखान्यांमध्ये झालेली वाढ यामुळे शुद्ध हवा भेटत नाही. जाळेतून निघणारे धूर, शेतातील पिकावर व फळावर



केली जाणारी फवारणी, वेगवेगळे उद्योग धंदे यामुळे हवेचे प्रदूषण वाढत आहे. मोठी शहरं आता धोक्याची घंटा बनत चालले आहेत. पर्वताच्या रांगेतील लोकांचे आरोग्य चांगले असतेच, त्यामुळे ते अधिक काळ जगतात. त्यास तिथे असलेली शुद्ध हवा कारणीभूत आहे. असा संदेश या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर यांनी दिला. झाडे निसर्गाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. त्यांना नैसर्गिक ऑक्सिजन पुरवठादार म्हटले जाते. पर्यावरणीय संतुलन राखण्यात झाडे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. ते विविध वन्यजीव प्रजाती आणि पक्ष्यांचे निवासस्थान आहेत. वृक्षारोपण आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचे आहे. पृथ्वी–वरील हिरवळ वाढवण्यासाठी, वृक्षारोपणाचा पुढाकार घेता येईल. आपल्या घरात आणि समाजात झाडे लावणे हे निसर्गाच्या दिशेने एक उत्तम पाऊल असू शकते. पृथ्वीवरील जीवनासाठी झाडे महत्त्वाची आहेत, शाकाहारी प्राणी झाडांच्या पानांवर अवलंबून असतात. वृक्षारोपणाला वाढण्यासाठी सुपीक जमीन आवश्यक आहे. आपल्या पर्यावरणाचे तापमान राखण्यासाठी देखील झाडे मदत करतात. वृक्षारोपणाचे अनेक फायदे आहेत. ते सावली, फळे, शाकाहारी प्राण्यांना अन्न इत्यादी प्रदान करतात, झाडे आपल्याला सावली देतात, इत्यादी. तथापि, गेल्या दशकापासून जंगलतोडीची समस्या वाढली आहे. असे प्रतिपादन सुलभक श्री सुलभक श्री आर व्ही कांगणे यांनी केले प्रसंगी सुलभक प्रा.कांगणे बोलत होते. यावेळी सूलभक एस.पी. गोर्डे, श्री वैद्य सर, पारसकर सर यांच्यासह प्रा.सहदेव मोरे पाटील, प्रा.ओमप्रकाश बोरकर, प्रा.पंकज कद्रे, शंकर राठोड, संदीप सानप सुनील राठोड संदेश राठोड योगेश रोहिणकर जगन्नाथ जगताप कल्पना शिंदे प्रदीप राठोड पृथ्वीराज राठोड रवी राठोड वर्षा पवार मुनीब अमानी शिवाजी टेकाळे शिवगंगा लिंगनवाड संदीप पवार गजानन जाधव संतोष अंभोरे मुरलीधर कायंदे राजेश राठोड श्याम राऊत मिर्झा बेग विलास हाके मधुकर कराळे प्रशांत प्रशांत काळे सिद्धीकि नसीर विष्णू खरात भागवत बरकुले संजीव वावळे पांडुरंग बेले अनिता पवार सतीश वावळ राहुल सवादे नारायण खरात भगवान वघराळ यांच्यासह अनेक प्रशिक्षणार्थींची उपस्थिती होती.

# 'वंदे भारत एक्सप्रेस' आता नांदेडहून सुटणार



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि.१२ जून -**

जालना ते मुंबई धावणारी वंदे भारत एक्सप्रेस आता जालन्याऐवजी नांदेडहुन सुटणार असुन यामुळे नांदेड येथील प्रवाशांची सोय झाली आहे.

वंदे भारत एक्सप्रेस नांदेडहून पहाटे ५ वाजता निघुन परभणी ५. ४० वा., जालना ७. २० वा. छत्रपती संभाजीनगरात सकाळी ८. १३ वाजता येईल आणि मुंबई येथे दुपारी २. २५ वाजता पोहचेल. तसेच परतीच्या प्रवासाच्या वेळेत बदल झाला नसून मुंबई येथून दुपारी १. १० वाजता निघून छत्रपती संभाजीनगरात सायंकाळी ७. ०५ वाजता पोहचेल. तर जालना ८. ०५ वा., परभणी ९. ४३ वा. येऊन नांदेड येथे पोहचण्याची वेळी १०. ५० वाजेची असुननवीन वेळ गैरसोयीची असल्यामुळे शहरातील प्रवाशांच्या संख्येत घट होण्याची शक्यता आहे. नवीन वेळापत्रक लवकरच लागू करण्यात येईल अशी माहिती रेल्वे विभागाने एका पत्रकाद्वारे दिली आहे.

**खा. अशोक चव्हाण यांनी मानले आभार**

नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसच्या माध्यमातून नांदेडकरांचे एक स्वप्न प्रत्यक्षात आणल्याबद्दल खा. अशोक चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रेल्वे राज्यमंत्री रवनीतसिंह बिट्टू यांचे सोशल मिडीयावर आभार मानले आहेत.

नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सुरु करण्याचे संपूर्ण श्रेय माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे असुन त्यांनीच २०२३ मध्ये नांदेड-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसची घोषणा केली होती. त्यांच्या मंत्रीपदाच्या काळातच ही गाडी मुंबईहून जालनापर्यंत सुरू झाली. जालना ते नांदेड दरम्यानच्या मार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झाल्यानंतर ही गाडी नांदेडपर्यंत धावणार असल्याचे पूर्वनियोजित होते. त्यामुळे खा. अशोक चव्हाण यांनी माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे विशेष आभार मानले.

# लिंबगाव पोलीसांची अवैध रेती वाहतुकीवर कारवाई ; ७० लाखाचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि.१२ जून -**

लिंबगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलीस व महसूल खात्याच्या पथकाने तळणी शिवारात दोन हायवा व अवैध रेती असा ७० लाख ५० हजार रुपयांचा माल जप्त केला असून याबाबत चौघांना अटक करण्यात आली आहे.

सहायक पोलीस निरीक्षक पंढरीनाथ बोधनकर व महसूल विभागाचे मंडळ अधिकारी कुणाल जगताप यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार तळणी



परिसरात अवैध रेती उपसा मोठ्या प्रमाणात सुरु असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तळणी परिसरात मोठा फौजफाटा नेवून तेथे कारवाई केली. यात हायवा क्र.एमएच-४६-बीबी-४५५५ व हायवा क्र.एमएच-२७-बीएक्स-६१९८ व त्यातील रेती असा ७० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातील आरोपी शेख मोहसीन शेख जलील रा.काठोडा ता.औंढा, केशव मुदनल रा.चौंडी ता.वसमत, सय्यद नसीर सय्यद गुलाम रा.वसमत, फेरोज मुसा पठाण रा.शुक्रवार पेठ वसमत या चौघांविरुध्द गुन्हा नोंदवून त्यांच्याविरुध्द कारवाई केली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रवादी अर्धापूर तालुकाध्यक्षपदी आत्माराम कपाटे तर शहराध्यक्षपदी साबेर शेख

**अर्धापूर** -तालुक्यातील तरूण तडफदार युवा कार्यकर्ते आत्माराम कपाटे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अर्धापूर तालुकाध्यक्षपदी तर शेख साबेर यांची अर्धापूर शहराध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, (अजितदादा पवार गटाचे) नांदेड जिल्ह्याचे नेते तथा लोहा कंधार विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रतापराव चिखलीकर यांच्या हस्ते तालुकाध्यक्ष आत्माराम कपाटे व शहराध्यक्ष शेख साबेर यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगांवकर, रामराव पाटील सोमठाणकर, उदय चव्हाण, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे, युवती जिल्हाध्यक्ष ज्योती सोनटक्के, माजी तालुकाध्यक्ष शशीकांत क्षिरसागर, चंद्रकांत टेकाळे, माजी शहराध्यक्ष संदिप राऊत यांची उपस्थिती होती. अर्धापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी आत्माराम पाटील कपाटे यांची तर शहराध्यक्षपदी शेख साबेर यांची निवड झाल्याबद्दल त्यांना अनेकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. घर तीथे राष्ट्रवादी गाव तिथे शाखा याप्रमाणे राष्ट्रवादी पक्ष बांधनीचे काम हाती घेण्यात येणार असल्याचे यावेळी तालुकाध्यक्ष आत्माराम कपाटे यांनी सांगितले.



### गणेश गुरुपवारची युवा अटल फाऊंडेशनच्या दक्षिण जिल्हाध्यक्ष पदी निवड



**नायगाव-** भारतीय जनता पक्षातील निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ते गणेश भाऊ गुरुपवारची युवा अटल फाऊंडेशनच्या दक्षिण जिल्हाध्यक्ष पदावर नुकतीच निवड करण्यात आल्यामुळे नायगांव बिलोली या तालुक्यातील ग्रामीण भागातील भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील गणेश भाऊ गुरुवार यांनी गेल्या काही अनेक वर्षा पासून कमी कालावधीत आपल्या विकास कार्याच्या बळावर राज्यांमध्ये नंबर एकचा पक्ष म्हणून ख्याती मिळविलेल्या भारतीय जनता पक्षाच्या तील विचारधारेशी बांधिलकी ठेवत आज तागायत भाजपा पक्षातील विविध जबाबदार पदी विराजमान होवून ग्रामीण भागामध्ये ही गेल्या वस वर्षापासून जनसामान्यांच्या सुख दुःखात सह भागी होऊन कष्टकरी गोर गरीब मायबाप जनतेसाठी अहोरात्र मेहनत घेतली आहे.त्यामूळे त्यांचा ग्रामीण भागात जनसंपर्क दांडगा असुन त्यांनी आजपावेतो उत्कृष्ट रीत्या आपली कर्तव्य पार पाडली असुन. त्या चीच फलश्रुती म्हणून यावर्षातील जुन महिन्यांच्या प्रारंभी नव्यानेच भारतीय जनता पक्षाने युवा अटल फाउंडेशनच्या दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड केली असून.भाजपाच्या युवा प्रदेशाध्यक्ष युवा श्रुतीताई तुडमे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन पुढील राजकी य वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. भाजपाच्या नांदेड दक्षिणच्या जिल्हाध्यक्ष पदी गणेश गुरुपवारांनवर नायगांव, बिलोली तालुक्यातील ग्रामीण भागात तील राजकीय,सामाजिक क्षेत्रातील निष्ठावंत माहेवार, भाजपा माजी तालूका उपाध्यक्ष शिवकुमार खांडरे, प्रशांत शक्करकोट, माहीमेवार तडका साठ ,मारुती पाशावार, विश्वनाथ स्वामी, गंगाधर दुसलवाड, गंगाधर पोलसवाड ,दिनेश रामोड, सचिन जोरगेवार सह आदि मात्तबर मंडळींनी शुभेच्छांचा वर्षाव करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### अहमदाबाद विमान दुर्घटनेतील मृतकांना काँग्रेसने वाहिली श्रध्दांजली



**नांदेड** -अहमदाबाद येथील विमान अपघाताच्या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर नियोजित मशाल रॅलीला स्थगित देत शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने विमान अपघातातील मृतकांना, काँग्रेस कार्यालय नवा मोंढा येथे शुक्रवार (ता.१३) रोजी श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी खा. रवींद्र चव्हाण यांनी मनोगतातून संवेदना व्यक्त केल्या. गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे विमान अपघाताच्या दुःखद घटनेत प्रवासी, कर्मचारी व स्थानिक नागरिक यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने तीन दिवसाचा दुःखवटा घोषित केला आहे. दरम्यान शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवार रोजी नियोजित असलेली मशाल रॅली रद्द करत शहर व जिल्हा काँग्रेस कार्यालय येथे मृतकांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेशदादा गायकवाड, मसुद खान, शमिम अब्दुला, संजय बेळगे, राजेश पावडे, आनंद चव्हाण, बालाजी गाडे, महेश देशमुख तरोडेकर, विठ्ठल पावडे, सतिश देशमुख तरोडेकर, निरंजन पावडे, गंगाधर सोनकांबळे, मुन्ना अब्बास, बालाजी चव्हाण, प्रफुल्ल सावंत, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, रहिम खान, डॉ. रेखा चव्हाण, डॉ. करुणा जमदाडे, मुन्तजिब, बापूसाहेब पाटील, माधवराव पवळे, गणेश पाटील ढगे, गगन यादव, दिपकसिंग हजुरीया, संजय वाघमारे, अनिल कांबळे, उध्दव लांडगे, रहिम पठाण, गणेश पाटील, शेख मुख्तार, रमेश चित्ते, नईम शेख ,अंबादास रातोळे, प्रसेन्नजित वाघमारे, धनंजय उमरीकर प्रथमेश गिरी आदीसह इतर मान्यवर उपस्थित होते.

## पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि.१३ जून -**

राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे शनिवार १४ जून २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहील.

शनिवार १४ जून, २०२५ रोजी दुपारी १२ वा. हिंगोली येथून वाहनाने अर्धापूर जि. नांदेडकडे प्रयाण. दुपारी १ वा. अर्धापूर, जि. नांदेड येथे आगमन व अर्धापूर तालुक्यातील वादळ वाऱ्याने नुकसानग्रस्त भागांना भेटी. सोईनुसार अर्धापूर जि. नांदेड येथून शासकीय विश्रामगृह, नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सोईनुसार शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. सोईनुसार नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.

# जल जीवन मिशनअंतर्गत करखेली येथे घराघरात नळाद्वारे शुद्ध पाणी पुरवठा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड , दि.१२ जून -**

जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील सीमावर्ती करखेली गावात जलजीवन मिशनअंतर्गत उत्कृष्ट नळ पाणीपुरवठा योजना यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेमुळे सुमारे ८ हजार लोकसंख्येला दररोज शुद्ध व नियमित पाणीपुरवठा सुरू झाला असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



धर्माबाद शहरापासून अवघ्या १० किलोमीटर अंतरावर असलेल्या करखेली गावाची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ४ हजार ६७५ होती, मात्र आज ती सुमारे ८ हजारांवर पोहोचली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन जलजीवन मिशनअंतर्गत सुमारे २ कोटी २७ लाख रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली.

या योजनेअंतर्गत एक विहीर खोदण्यात आली असून त्यात २० एचपी क्षमतेचा सबमर्सिबल पंप बसवण्यात आला आहे. या विहिरीपासून गावातील मुख्य पाण्याच्या टाकीपर्यंत १८० मिमी व्यासाच्या सहा केजी क्षमतेच्या एचडीपीई पाईपद्वारे दोन किलोमीटर लांबीची पाईपलाईन टाकण्यात आली आहे.

तसेच गावासाठी ३ लक्ष ८५ हजार लिटर क्षमतेची जलटाकी उभारण्यात आली आहे. या टाकीमधून गावात सुमारे ८ किलोमीटर लांबीची तीन इंची वितरण पाईपलाईन टाकून ५०८ घरांना नळ जोडण्या देण्यात आल्या आहेत. यामुळे हर घर नळ संकल्पनेनुसार प्रत्येक कुटुंबाला थेट नळाद्वारे स्वच्छ पाणी मिळू लागले आहे.

या योजनेमुळे गावातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमचा सुटल्याने ग्रामस्थांनी शासनाचे आभार मानले आहेत. ही योजना ग्रामविकासाचे उत्कृष्ट उदाहरण ठरत असून तिच्या प्रभावामुळे इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरत आहे, असे मत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब यांनी व्यक्त केले.

## महिलेस जातीवाचक शिवीगाळ; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड , दि.१२ जून -**

धनेगाव येथील तिरुपती सोसायटी मधील मधुबन शाळेच्या बाजुला रहाणाऱ्या एका दलीत महिलेला शिवीगाळ करून शारीरीक छळ केल्याप्रकरणी नांदेड ग्रामिण पोलिस ठाणे येथे धनेगाव येथील देशमुख बंधु चौघाजना विरुध्द महिलेच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सुत्रानी दिलेल्या माहीतीवरुन धनेगाव येथील तिरुपती सोसायटीत रहाणाऱ्या एका दलित महिलेला दि १२ रोजी रात्री घरी (प्लॉट)जाताना येथे उभ्या असलेल्या केशव गोविंदराव देशमुख मारोती गोविंदराव देशमुख नवनाथ गोविंदराव देशमुख माधव गोविंदराव देशमुख या भावानी जातीवाचक शिवीगाळ करत तिच्या छातीवर,पोटावर हात ठेवत मारहान करुन तिचा विनयभंग केल्याची घटना दि १२ रोजी रात्री ९ वाजुन २२मीनीटाने घडली. या प्रकरणी दलित महिलेच्या तक्रारीवरुन सिडको ग्रामिण पोलिसांनी चौघा विरुध्द गुन्हा दाखल करत उपविभागीय पोलिस अधिकारी सुशिलकुमार नायक यांच्याकडे गुन्हा वर्ग करण्यात आला आहे.

# मुदखेड येथे भिखू संघाच्या हस्ते चैत्य स्मारकाचा लोकार्पण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि.१३ जून -**

मुदखेड शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथे कालवश भदन्त पद्मरत्न थेरो हे अनेक वर्षापासुन वास्तव्यास होते त्यांचे निर्वाण दि. ०५ ऑक्टोंबर २०२२ रोजी झाले होते.

त्यांच्या स्मृती नेहमीसाठी जागृत राहाव्यात म्हणून नालंदा चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने बौद्ध प्रशिक्षण केंद्र परिसरात त्यांचे चैत्य स्मारक बांधण्यात आले आहे. त्या चैत्य स्मारकाचे लोकार्पण सोहळा दि. ११ जुन जेष्ट पोर्णिमा रोजी सकाळी १०:०० वाजता आयोजन करण्यात आले.

या चैत्य स्मारक लोकार्पण सोहळ्याचे औचित्य साधुन भिखू संघाने तेथील उपस्थितांना धम्मदेसना दिली. आणि शहरातील धम्म प्रेमी बौद्ध उपासक, उपासिका, बालक, बालिका,



यांनी धम्मदेशनेचा लाभ घेतला.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून अनंत महाकश्यप मनोरा वाशिम,भिखू पैय्याबोधी थेरो खुरगाव, भिखू शिलरत्न थेरो नांदेड, भिखू सुभूती थेरो तापोवन भुमि, भिखू संघपाल थेरो वाजेगाव,भिखू पट्टीसेन थेरो गणपुर कामठा, भिखू गगनबोधी मुदखेड,आणि त्यांचा श्रामनेर संघ, माजी सैनिक सुनिल चौदंते, माजी सैनिक देविदास पवार, सावते सर,प्रियतम चौदंते, रविंद्र कांबळे, शिवानंद देवके, बाळकृष्ण चौदंते, महेंद्र चौदंते, धनंजय चौदंते, अमोल चौदंते, माधव ढगारे, यासह समाज बांधव उपस्थित होते. या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन भिखू शिलरत्न थेरो आणि शहरातील उपासकांनी केले होते.

## अचानक नाल्याला आलेल्या पुरात बैलगाडी गेली वाहून; बालकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि.१३ जून -**

किनवट तालुक्यातील तेलंगणा सीमेवरील अप्पारावपेठ येथे गुरुवारी दुपारी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. या पावसामुळे परिसरातील नाल्यांना पूर आले होते, शेतकरी शेताकडून बैल गाडीतून घराकडे येत होते. नाल्याला आलेल्या पुरात आजी-आजोबा व आईसोबत असलेला पाच वर्षाचा अभिनव गजेंद्र गुमुल हा बालक होता. नाल्याच्या पुरात ते सर्वजण वाहून जातांना सुदैवाने अन्य बचावले मात्र, अभिनव हा बालक पुरात वाहून जाऊन त्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.

दि. १२ जून रोजी दुपारी मोठा पाऊस झाला. या पावसामुळे अप्पारावपेठ येथील शेतकरी गजराम गुमुल, त्यांची सून अर्चना गजेंद्र गुमुल आणि त्यांचा पाच वर्षाचा नातू अभिनय गजेंद्र गुमुल यासह इतर दोन महिला बैलगाडीतून घराकडे येत असताना गावाजवळील नाल्यातून नाला पार करत असताना अचानक आलेल्या पूरात बैलगाडी उलटली. या घटनेत पाच वर्षाचा बालक अभिनव वाहून गेला. तब्बल दोन तासानंतर बालकाचा मृतदेह सापडला.

## सरापईत गुन्हेगारांना स्थागुशाने केली अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१२ जून -**

खुनाचा प्रयत्न व गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपींना छत्रपती संभाजीनगर येथे स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने अटक करुन त्यांना नांदेड येथे आणले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नांदेडच्या स्थानिक गुन्हा शाखेला व खंडणी विरोधी पथकाला खुनाचा प्रयत्न व गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपीचा शोध घ्यायचा होता. हि शोध मोहिम सुरु असताना छत्रपती संभाजीनगर येथील सातारा परिसरात नांदेडचे काही आरोपी असल्याचा सुगावा स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाला लागला. त्यानुसार काल पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी तेथे जावून सापळा



रचला. यातील साईसिंह गहेरवाल रा.सिडको, नितेश इंगळे रा.शिवनगर, निवृत्ती उर्फ निलेश रावसाहेब गोरठेकर रा.बाबानगर या तिघांना सापळा रचून छत्रपती संभाजीनगर येथे पकडले. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या विविध गुन्ह्यात ते नांदेड पोलिसांना हवे होते. पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व खंडणी विरोधी पथकाने हि कारवाई करण्यात आली. या तिघांकडून गंभीर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## लोकशाही दिन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१२ जून -**

समस्याग्रस्त व पिडीत महिलांसाठी सोमवार १६ जून २०२५ रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. या लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# रामतीर्थचे सपोनि श्रीधर जगताप यांना भावपूर्ण निरोप



**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि.१३ जून -**

नरसी येथील पोलीस चौकीच्या भव्य प्रांगणात दिनांक १३ जून रोजी रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (सपोनि) श्रीधर भागवतराव जगताप यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साही आणि भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात गुजरात राज्यातील विमान अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना एक मिनिट मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते आनंदराव सूर्यवंशी यांनी आपल्या मनोगतात म्हटले की, सपोनि श्रीधर जगताप यांनी 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या पोलीस दलाच्या ब्रिदवाक्याला अनुसरून अत्यंत निष्ठेने आणि शिस्तबद्धतेने रामतीर्थ ठाण्याचा कारभार पार पाडला. दीड वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक गुन्हे उकलत गुन्हेगारांना गजाआड केले.

ते पुढे म्हणाले,गुन्हे उकलण्यापुरतेच त्यांचे योगदान मर्यादित नव्हते. त्यांनी नरसी येथील पोलिस चौकी त लोकसहभागातून एक नवीन खोली उभारली. तसेच अनेक सामाजिक उपक्रम राबवत समाजाशी सकारात्मक संबंध निर्माण केला. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी सपोनि जगताप यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देत सन्मान केला. उपस्थित ग्रामस्थ व सहकाऱ्यांनी पुष्पवृष्टी करत त्यांना भावपूर्ण निरोप दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आटकळी बिटचे जमादार जांभळी यांनी केले तर आभार प्रदर्शनही जमादार जांभळीकर यांनीच केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामतीर्थ पोलीस ठाण्या चे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हानुमंत हराळे होते. मनोगत व्यक्त करताना त्यांनी सांगितले, ज्या विश्वासाने श्रीधर जगताप यांनी रामतीर्थ पोलीस ठाण्याचा कारभार सांभाळला,त्याच तन्मय तेने मीही काम करणार आहे. कायदा व सुव्यवस्था टिकवण्यासाठी सामान्य जनतेचे सहकार्य मला अपेक्षित आहे. नागरिकांचा सहभाग आणि विश्वास हेच पोलिस खात्याचे खरे बळ आहे.

कार्यक्रमाला परिसरातील पोलीस अधिकारी, ग्रामस्थ, सरपंच, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल टाकळीचे भेलोंडे, डोणगांचे सरपंच व पोलीस पाटील पत्रकार, गंगाधर गंगासागरे,तालुका उपाध्यक्ष गोविंद टोकलवाड,आनंदराव सुर्यवंशी, गणेश कंदूर्केसह अनेक सामाजिक कार्यकर्ते तसेच टाकळी, नरसी, लोहगाव, डोणगाव येथील प्रतिनिधी आणि पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

# २५ लाखांचा निधी रखडला, खेळाडूंचे भवितव्य धोक्यात; जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**किनवट , दि.१३ जून -**

शासनाच्या आदिवासी उपयोजनेतून नांदेड जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना मंजूर झालेला २५ लाख रुपयांचा निधी गेल्या तीन महिन्यांपासून धूळखात पडून आहे. हा निधी आदिवासी भागातील युवकांसाठी क्रीडा साहित्य, क्रीडा संकुल सुविधा आणि व्यायामशाळांच्या दुरुस्तीसाठी होता. मात्र, प्रशासनाच्या निष्काळजी आणि निष्क्रिय वृत्तीमुळे या योजनेचे उद्दिष्टच धोक्यात आले आहे. यामुळे स्थानिक खेळाडू, क्रीडाप्रेमी आणि सामाजिक संघटनांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

शासनाने १८ मार्च २०२५ रोजी या निधीला मंजुरी देताना स्पष्ट आदेश दिले होते की, निधी प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्याचा उपयोग करून अहवाल सादर करावा. परंतु, तीन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही ना साहित्य खरेदी झाली, ना कंत्राटदारांची नियुक्ती झाली, ना टेंडर प्रक्रिया सुरू झाली. यामुळे शासनाच्या आदेशांचा थेट अवमान झाला आहे. निधी नेमका कुठे अडकला, याबाबत कोणतेही ठोस उत्तर प्रशासनाकडून मिळत नाही. यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. किनवट शहरातील क्रीडा संकुल आणि व्यायामशाळांमधील साहित्य जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत आहे. काही उपकरणे इतकी खराब झाली आहेत की, त्यामुळे खेळाडूंच्या आरोग्याला आणि जीवाला धोका निर्माण झाला आहे. तालुक्यात स्थायी क्रीडा अधिकारी नसल्याने या समस्यांकडे कोणाचेही लक्ष नाही. परिणामी, स्थानिक खेळाडूंना सरावासाठी आवश्यक सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. यामुळे त्यांचे मनोधैर्य खचत असून, त्यांच्या क्रीडा कारकीर्दीवरही विपरीत परिणाम होत आहे.

या प्रकरणाने शासनाचा २५ लाखांचा निधी नेमका कुठे अडकला आहे? निधीच्या वापरात एवढी ढिलाई का होत आहे? संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होणार की नाही? निधी खर्चाचा लेखाजोखा आणि प्रगती अहवाल कुठे आहे? असे अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. या प्रश्नांची उत्तरे न मिळाल्याने प्रशासनाच्या पारदर्शकतेवर आणि जबाबदारीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

किनवटमधील क्रीडाप्रेमी, खेळाडू, पालक, शिक्षक आणि सामाजिक संघटनांनी या निष्काळजीपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी तपास समिती नेमून दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. निधीचा उपयोग न झाल्यास तो रद्द होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे आदिवासी खेळाडूंना हक्काच्या सुविधांपासून वंचित राहावे लागेल. यामुळे शासनाच्या क्रीडा विकासाच्या उद्दिष्टांनाच तडा जाण्याची भीती आहे.

या प्रकरणाला आळा घालण्यासाठी स्थानिक जनप्रतिनिधी, पत्रकार आणि सामाजिक नेतृत्वाने ही बाब वरिष्ठ स्तरावर उचलून धरणे गरजेचे आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे क्रीडा क्षेत्रातील विकास खुंटला आहे. यामुळे भविष्यातील शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. यासाठी तातडीने पावले उचलून उत्तरदायी अधिकाऱ्यांना जबाबदार धरणे आवश्यक असल्याची चर्चा होत आहे.